THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192672
UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M83 B41B  Accession No. M1040

Author બી, રઘુનાથ

Title વાયુ ધડકે.

This book should be returned on or before the date last marked below.

णा प्रकाशन-२७

# बाबू दडके

बी. रघुनाथ

डिसेंबर
१९४४

प्रकाशक

ब. गो. गर्गे.

वीणा प्रकाशन,

नागपूर.

संपादक

ब. गो. गर्गे, एम्. ए.

द्वा. वा. घाटे,

बी. ए., एल्एल्. बी.

मुद्रक—पु. रा. खांडवेकर, बी. एस्सी., एल्एल्. बी.

मॅनेजर, गोपाल प्रिंटिंग प्रेस, महाल, नागपूर.

# — वीणा प्रकाशन —

| | | | |
|---|---|---|---|
| (२) | स्वैरविचार | माडखोलकर | रु १॥। |
| (३) | दोन मनें | खांडेकर | ३ |
| (४) | कांता | माडखोलकर | ३ |
| (५) | आविष्कार | गीता साने | १॥ |
| (६) | हेमलता | द्वा. वा. घाटे | १ |
| (८) | निष्कलंक | कमल दीक्षित | १॥ |
| (९) | विशाल जीवन | पी. वाय. देशपांडे | २॥ |
| (१०) | उषःप्रभा | मांजरेकर | १॥ |
| (११) | झंझावात | बोकील | २॥ |
| (१२) | पहिली लाट | खांडेकर | २ |
| (१३) | साकी | बी. रघुनाथ | १ |
| (१४) | मुखवटे | माडखोलकर | ३ |
| (१५) | काळी राणी | पी. वाय्. देशपांडे | ३ |
| (१६) | स्वीकार | शरच्चंद्र टोंगो | १॥ |
| (१७) | आव्हान | माडखोलकर | १॥। |
| (१८) | संक्रमण | वरखेडकर | १॥। |
| (१९) | धूर व इतर एकांकिका | काणेकर | १॥। |
| (२०) | सुखदुःखविवेक | वऱ्हाडपांडे | २॥। |
| (२१) | डाक बंगला | माडखोलकर | १॥ |
| (२२) | न रुळलेले मार्ग | पां. वि. खांडेकर | २ |
| (२३) | हिरवे गुलाब | बी. रघुनाथ | १। |
| (२४) | माझा लढा | ज्ञानसागर | ४ |
| (२५) | अजिंक्य तारा सर | पां. वि. खांडेकर | २ |
| (२६) | दर्यासारंग | मोरया आपटे | २ |

| | | |
|---|---|---|
| (२७) बाबू दडके | बी. रघुनाथ | रु. १॥ |
| (२८) वीरारत्नमंजूषा | ग. दा. सावरकर | २ |
| (२९) प्रवासी राम | अमरेन्द्र | २॥ |
| (३०) नवीं मूल्यें | पी. वायू. देशपांडे | |
| (३१) यौवनाच्या लाटा | देवदत्त | |

# आमचीं इतर प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| ( १ ) समाजसत्तावाद | द. ल. जयवंत | रु. १ |
| ( २ ) स्टालिन चरित्र | ,, | छापत आहे |
| ( ३ ) सन १८५७ ( नाटक ) | हंबर्डे | ।॥। |
| ( ४ ) बिगारीचा बैल (,,) | ,, | ॥. |
| ( ५ ) कविता संग्रह | बोबडे | १॥ |
| ( ६ ) शर्वरी ( काव्य ) | रामभजनी | १। |
| ( ७ ) कूजन ( ,, ) | ' हुताश ' | १। |
| ( ८ ) छाया ( ,, ) | टेकाडे | ।. |
| ( ९ ) पतितेचें हृदय ( कादंबरी ) | गडकरी | १॥ |
| (१०) धबधब्याच्या धारेत ( ,, ) | पाठक | १॥। |
| (११) गांधीवाद | मराठे | ।= |
| (१२) आन्दोलनें ( कथासंग्रह ) | प्रधान | १ |

# ऋणानुबंध ?

## खंडाळं ! 1

विश्वविद्यालयानं बक्षिसं देऊन प्रशंसिलेल्या अथवा अभ्यासक्रमांत नेमल्या गेलेल्या कोणत्याहि ग्रंथापेक्षां उपयुक्त माहितीनं फार परिपूर्ण पण किंमतीनं कमी असा एक ग्रंथ कुठल्याहि व्हिलर स्टॉलवर मिळेल, तो तुम्ही पहा. ' आगगाड्यांचें वेळापत्रक ' असं त्याचं थोडंसं खडबडीत अन् काव्यहीन नांव असलं तरी आंत रंगीबेरंगी कलाकुसर आढळेल. ह्या विभागाच्या काळ्या काटेरी रेषा दर्शविणारा नकाशा उघडून बघितलांत तर एका रेषेवर वरील गांवाचं नांव तुम्हाला वाचायला मिळेल.

सिमला, मसूरी, महाबळेश्वर अथवा माथेरानपेक्षां खंडाळं हें सर्वस्वी निराळं. इथ लाटांचे बंगले नाहींत. सोजिरांच्या खाटा नाहींत. डोंगर नाहीं, झाडी नाहीं, कांहीं नाहीं. कधीं उष्णतामान भडकलं नाहीं. कधीं कडाक्याची थंडी पडली नाहीं. घरं वाहून जातील इतका कधी पाऊस झाला नाहीं. धरणीकंपाचे धक्के बसून गांव बेचिराख व्हायची वेळ आली नाहीं. एक जिल्ह्याचं गांव हेंच त्याचं महत्त्व.

क्षेत्र म्हटलं कीं मंदीर, तीर्थ, यात्रेकरूं, बडवे, क्षौर आणि दक्षिणा इत्यादि आकृति अन् कृती झरकन् मनांत येतात

जिल्ह्याचं गांव म्हटलं कीं स्टेशन, कस्टमखातं, मोंढा, सरकारी कचेऱ्या, हायस्कूल, दवाखाना, पोस्ट हपीस, वेश्यांची ओळी आणि जेल इत्यादि गोष्टींचीं चित्रं मनापुढं एकदम यायलाच पाहिजेत.

हीं सारीं भूषणं खडाळ्याला आहेत.

परगांवहून खडाळ्याला येणारा वर्ग बहुधा अलंकाराच्या आकर्षणांतच यायचा. नाहीं म्हटलं तर लगीन सराईत कांहीं नव्या-नवऱ्या, मोसम न पाहतांच येऊन टपकणारा एखादा जामखेडी हरिदास, नागपूर मुंबईकडचा एखादा पुस्तक विक्रेता, एकादं बऱ्हाणपुरी कबूतर, भगवद्गीतेवर प्रवचन अन् मिळेल तिथं भोजन झोडणारा एकादा शास्त्री, एकादा पंजाबी हिंगाविक्या, अन् अगदींच टाकून दिलं तर 'भजले रामलीला' वाली एकादी परदेशी भिकाऱ्यांची टोळी अशी काय ती आवक व्हायची.

एकादा श्रीमान् कैलासवासी झाला, बाजारांत मारामारी होऊन डोकीं फुटलीं, एकादी बाई पळविली अथवा बाटविली गेली, तरच खडाळ्यांत कांहीं तरी घडलं असं मानायला समाधान असे. याखेरीज व्हायच्या त्याही गोष्टी होत. मोहरमच्या मिरवणूकी निघत. हिंदु मुस्लिम ऐक्यावर वक्तव्य ऐकायला मिळे. सरकार, पुढारी, पुढचा काळ यावर आतल्याआंत अन् आतल्या आवाजांत चर्चा होई. वर्तमान पत्रांतले अग्रलेख वाचले जात. झालीच सरकारी कृपा तर जयंत्या अन् स्मृतिदिन साजरे होत. नाहीं तर उपद्रव अन् उपसर्ग सहन करायला खडाळं केव्हांहि तयार होतंच !

पण गेले कांहीं दिवस खडाळावरून जें वारं वहात होतं तें उष्ण आणि उफाळतं होतं. वातावरणांत थारेपालट घडून येण्याचीं

चिन्हं दिसत होतीं. जंगून गेलेल्या कांहीं वृत्तींनीं अन् विचारांनीं विजेची चमक दाखविली होती. स्टेट कांग्रेस, जबाबदार राज्यपद्धति नागरिक स्वातंत्र्य, इत्यादि स्फोटकद्रव्यें बाहेर आलीं होतीं. त्यागाच्या आणि आत्मयज्ञाच्या तेजस्वी कल्पनांनीं कित्येक मनोमंदिरं दुमदुमून गेलीं होतीं. सरकारी भाषेंत सांगायचं म्हणजे जनतेत अशांतता माजविण्याचा खोडसाळ प्रयत्न झाला होता.

खडाळ्यांत अन् खडाळ्याच्या त्या बदललेल्या वातावरणांत बाबू दडक्यानं जें पाहिलं, अनुभवलं, केलं आणि सोसलं होतं तें नोंद करून ठेवण्याइतकं महत्वाचं होतं !

बाबू दडक्याचं खडाळ्याला पहिल्यांदा स्वागत झालं तें असं—

खडाळ्यावरून जाणारी एक गाडी स्टेशनमध्यें आली. बाबूराव अर्थात् तिसऱ्या वर्गातून प्रवास करीत होते. प्लॅटफार्मवरची गर्दी काय विचारतां ! अन् तशात पोलिसांची एक गॅट देखील खडी ! कुठल्याशा मारवाड्याचं लगीनही ह्याच गाडीनं वाजत अन् गाजत उतरलं. पोलिसांनीं बॅंड आणि ड्रम झडविले. सलामीच्या कवायती झाल्या. हार तुरेचा सोहळा संपला आणि गर्दी हटू लागली. अन् जरा वेळानं प्लॅटफार्म रिकामा झाला.

एक पोर्टर हातात सांध्याची किल्ली घेऊन 'खडाल ठण्णे' होत असलेल्या स्टेशनच्या इमारतीत शिरत होता. 'गरम चाय' अन् 'पानबिडी' वाले ननानाचा तराणा करीत दूर सरकूं लागले होते.

बायकांच्या डब्यातून पाणी वाटणारी म्हालीण परत जायला वळली होती. बस् ! आणखी कुणी नव्हतं. पण बाबू दडके मात्र निळा पोशाख केलेल्या एका रेलवे पोलिसाच्या ताब्यांत होता !

उतारूंच्या गर्दीत, गजबजाटांत अन् गोंधळांत त्याचं तिकीट हरवलं होतं. तें प्लॅटफार्मवर पडण्या इतकं इमानी नसावं. त्यानं टिकीट घेतलं होतं हे सत्य होतं. पण फाटकापासच्या तिकिटं तपासणाऱ्याला बाबूवर विश्वास ठेवायला कांहीं आधार नव्हता. चिरीमिरी इतकेही पुरेसे खिशांत पैसे नव्हते. अन् त्याचं सामान हारास केलं तरी तिकीटाची किंमत वसूल होणं शक्य नव्हतं. रेल्वे कंपनीच्या त्या इमानी नोकरानं बाबूला पोलिसाच्या स्वाधीन करून टाकलं! पोलिस !

हा प्राणी बाबू आज नव्यानं पहात नव्हता. अगदी जन्मापासून हें लचांड त्याच्या पाठीमागं होतं. त्याचा जननोत्सव कांहीं सामान्य ठिकाणीं झाला नाहीं. एका प्रशस्त इमारतीच्या लहानशा दालनांत डॉक्टर, नर्सेस, इतर सटर फटर नौकर चाकर दिमतीला असतांना ! अर्थात् तें सरकारी सूतिकागृह होतं. अन् जीवनाचा बाबूनं स्वीकार केला तेव्हां त्याची ललकारी ऐकून त्याचं स्वागत करायला दाराशी एक पोलीस होताच. बाबू कुठं तरी एकाद्या खड्डयांत नाहीतर नदीत मरून पडायचा अथवा तशा अवस्थेत तो तिथं आढळायचा. पण पोलिसामुळेंच त्याला जग दिसलं होतं. अन् तेंही फक्त धिःकार, खोटे आरोप आणि प्रहार करणारं !

कौमार्य संपवून यौवनाच्या नव्या उमेदींत अन् उमेदीसाठी तो खडाळ्याला उतरला तेव्हां देखील तो त्याच्यासाठीं पोलिस हजर!

साऱ्या कठोर आणि कडवट द्रव्यांच्या रसांनींच ही पोलिसी मनं घडविलीं असतात कीं काय कोण जाणे ! वेश तरी कसा बघा ! सिटी पोलिसांचा अगदी भकास खाकी. तर रेल्वे पोलिसांचा गडद

निळा. सारे कलंक आणि मालिन्य ज्यांत सहज छपून जातील असे हे रंग. मृदु आणि सत्यशील भावना व्यक्त करण्यासाठीं एकादा गावठी चित्रकार देखील हे रंग वापरण्यास सहसा तयार होत नाहीं.

या निळया नरसिंहाला बाबू घाबरला नव्हता. पण आपण निर्दोष असल्याचें सिद्ध करतां येत नाहीं, याचं त्याला वाईट वाटलं होतं. एकाद्या सभ्य तिऱ्हाईतानं हे पाहिलं तर लबाड अन् लुच्चा अशा अर्थाचे आपल्या चारित्र्यावर तो शिंतोडे उडवील, या कल्पनेनं त्याचं पापभीरु मन व्याकुळ झालं होतं. नवल असं की अशा तऱ्हेच्या कांहीं चमत्कारिक दुःखानं अन् व्यथेनं त्याची पारध केली होती.

अखेर एक तरुण माणूस तिथं आला. जरा वेळानं येणाऱ्या गाडीनं त्याला कुठं जायचं असावं. त्यानं ह्या त्रांगड्याची चौकशी केली. बाबूचा चेहरा त्याला निर्दोष वाटला कीं, त्याची स्वभावतःच असलेली दयाशील वृत्ति जागी झाली कुणाला ठाऊक! दंड आणि तिकीटाची रकम भरून बाबूला त्यानं मोकळं केलं. लज्जेनं, विषादानं अन् कृतज्ञतेनं बाबूचं मन भारावून गेलं होतं. थोड्याशा अनभ्यस्त पण कमालीच्या अकृत्रिम शब्दांत उपकारकर्त्याचे आभार मानून स्टेशनच्या आवाराबाहेर तो पडला होता.

गावांत कुठं ओळखदेख नव्हती. अन् वेळ अशी होती की एका धर्मार्थ डाकबंगल्याकडं वळल्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतं. जवळ एक लहानसं देऊळ होतं. तिथं कधीं घंटा वाजत नव्हती अथवा दिवा लागत नव्हता. ह्या उपेक्षिलेल्या दैवी साहचर्यानं त्या जुनाट पडक्या धर्मशाळेच्या भकासपणाला फार तीव्रता आली होती.

संध्याकाळच्या उदास सावल्या केव्हाच पसरल्या होत्या. अन्

जरा वेळानं धर्मशाळेच्या पटांगणातल्या भल्या थोरल्या वडाच्या झाडानं अंधाराचा गडदपणा वाढविला होता. एका रिकाम्या मोहटींत एक अर्धपोटीं भटकं श्वान मान टाकून पसरलं होतं. पलीकडं लाकडाचा एक ओंडका जळत होता. 'जयशंकर' करणारी एक दिगंबर मूर्ति शांकरीच्या नाही तरी धूमविकेच्या उपासनेत मग्न दिसत होती. अन् दुसऱ्या एका ओसरीवर बाबूनं आपलं आंथरूण पसरलेलं होतं.

दैवाचा हा केवढा दुर्विलास म्हणावा कीं, सुचरित् आणि भूषविणारे वैभव शोधण्याकरितां आणि संपादण्यासाठीं जो बाहेर पडला होता, त्याला पहिला मुक्काम एका धर्मशाळेंत बाहेर करावा लागावा !

रेल्वे प्रवासानं थकून जाण्याइतका तो नाजूक नव्हता. पण पैसे अपुरे म्हणून मोठ्या पहाटे उठून एक दोन जवळचीं स्टेशनं त्यानं पायींच ओलांडली होतीं. अन् थकूं असं वाटल्यावर पुढच्या एका स्टेशनवर थांबून गाडीचा आश्रय घेतला होता. खडाळ्यांत जेवणाची अन् पुढच्या शिक्षणाची सोय लावून द्यायला आधार होईल असं एक परिचय पत्र खिशांत होतं अन् तें त्याच्या अन्तःकरणाला बिलगून सांगत होतं,

'जरा धीर धर ! तुझे कष्टाचे अन् खडतर दिवस संपत आले आहेत. मोठमोठ्या व्यक्तींचीं चरित्रं तूं वाचीत आला आहेस. त्यांनीं तर तुझ्यापेक्षांही अधिक अडचणींच्या मार्गातून प्रवास केला होता. अन् अखेर असाध्य त्यांना वश झालं होतं !........' समजू लागल्यापासून त्याला हें कळून आलं होतं कीं, इतर मुलं आप्तस्वकीयांकडून अन् समाजाकडून ज्या तऱ्हेनं वागविलीं

आणि जोपासलीं जातात त्या पद्धतीनं त्याला वाढविलं जात नव्हतं. तो निसर्गतःच वाढत आणि विकासत होता. एका ब्राम्हण-बालविधवेनं करूं नये ती चूक केली होती. परिचयाचं अन् नात्या-गोत्याचं जग सोडून ती कुठं तरी अज्ञानांत वावरत होती. अन् बाबूला जें ज्ञात होतं, तें त्याच्या कोवळ्या मनाला सोसवत नव्हतं. एखाद्या मलीन वस्त्राकडे बघावं तशा नीतिमान् नजरा त्याच्याकडे बघत होत्या. त्याला कमी लेखलं जात होतं. त्याच्या संबोधनासाठीं हलके शब्द अपुरे पडत होते.

निर्भत्सना आणि उपेक्षेनें त्याच्या उमलत्या मनाचे कांहीं भाग इतके अधू आणि दुखरे झाले होते कीं, कुठं आपल्या पदक्षेपानं सभोवतालच्या वातावरणांत एकादा विसंवादी सूर निघून सबंध विश्व आपल्या विरुद्ध कलुषित होऊन उठेल याची त्याला नेहमी धास्ती वाटत होती.

तिकीट हारवल्यामुळें तो पोलीसच्या ताब्यांत गेला होता. तें सहज झालं होतं. मानवी सृष्टींत फार मोठे उत्पात घडतील अशी ती घटना नव्हती.

पण आपल्याला त्या तशा अवस्थेत पाहून त्या उपकारकर्त्याला काय वाटलं असेल, याविषयीं नानातऱ्हेच्या अर्थात् कुशंकाच आंथ-रुणावर अंग टाकल्यावरहि त्याच्या मनांत आल्या. त्या भल्या माणसाचा चेहरा विसरणं त्याला शक्य नव्हतं पण बाबूनं निदान त्याचं नांव विचारून घ्यायला हवं होतं. हळू हळू डोळ्यावर झापड पडूं लागली होती. मग पुष्कळ वेळानं कुणी तरी त्याला हालवून म्हणालं होतं,

'अरे बाबू ऊठ! दिवस उजाडला बघ!' खरंच दिवस उजाडला होता पण ती उठवणारी व्यक्ती मात्र अंतर्धान पावली होती !

येथून असा समोर इमारतींचा जो घोळका दिसत आहे ना, त्यांत उठून दिसणारी इमारत ती कोर्टाची ! बाबू दडके वकील असता तरच त्याचा न् ह्या इमारतीचा संबंध येता. पण तसं नसतांनाहि बाबूला इथं यावं लागलं होतं. तें एका विचित्र अवस्थेंत अन् विलक्षण प्रसंगानं. सत्याचा निर्णय देणारं न्यायदेवतेचं हें मंदीर ! बाबूच्या बाबतींत ह्या न्यायदेवतेचा स्वभावतःच आंधळा असलेला डोळा चुकला आणि चळला होता. पोलीसांनीं न् वकीलांनीं चोखून चोखून शुष्क करून टाकलेल्या तिच्या स्तनांतील विषार तेवढं बाबूला झोंबत होतं.

तिकडे डाव्या हाताला थोडंसं पलीकडे काटेरी तारांचं कुंपण असलेलं पटांगण दिसतं आहे तें शाळेचं खेळाचं मैदान. मधोमधहि दक्षिणोत्तर उघडे व्हरान्डे असलेलं पॅव्हेलियन उभं आहे. पटांगणाच्या त्या टोकाला विस्तृत अन् सफेद्यानं झळकत असलेली इमारत म्हणजे खडाळ्याचं सरकारी विद्यामंदिर !

हेडमास्तर सीतारामराव म्हणजे मोठा करडा माणूस ! 'मायबाप' सरकारनंच आपल्याला हेडमास्तर केलं ही भावना फार जोरकस ! अधिकार असूनहि स्वधर्मीयांच्या अहिताखेरीज ज्यांना कांहींच करतां येणं शक्य नाहीं अशापैकी म्हणून त्यांचा लौकिक होता. बाबूला शाळेंत प्रवेश दिला तेव्हां त्याची वयाच्या मानानं थोडी ऊंच, मोठी आणि दणकट वाटेल अशी शरिरयष्टी पाहून हें भूत (Spirit) कांहीं निराळं तर नाहीं ना असा संशय त्यांच्या मनांत आल्याशिवाय

राहिला नाहीं. अन् त्याची खादीची टोपी तर त्यांना मुळीच आवडली नव्हती.

बाबू अभ्यासू होता. त्याचं गणित फार चांगलं होतं. पहिल्याच सहामाहींत तो त्या विषयांत पहिला आला होता. वर्गांत नाहीं तरी निम्म्याच्यावर मुलं नादार होतीं पण बाबूच्या नादारीचा न् स्कॉलर-शिपचा अर्ज कित्येक दिवस सितारामरावाच्या टेबलाच्या खणांत तसाच पडून होता. त्याचं दणकट शरीर, त्याची खादीची टोपी न् त्याचं 'बाबू दडके' होणं आड येत होतं. त्याला ते काय करणार?

हा खड्याळचा हमरस्ता. जागजागीं भिंताडावर बघाल तर सिनेमाच्या न् झाडून साऱ्या रोगावरील तडाखेबंद औषधांच्या जाहीराती आढळतील. सिनेमा पाहूनच कीं काय कोण जाणे साऱ्या सृष्टीला भयंकर कीड लागली आहे अन् देशी विदेशी वैद्यक त्या साऱ्या रोगांच्या निर्मूलनासाठीं कमालीचे उतावीळ झाले आहेत, असं न वाटल्यास नवल! पण एक काळ असा येऊन गेला होता कीं जुनाट तापावरील रामबाणांनीं अन् जवान मर्दांवरील जडी बुटींनीं रंगून भ्रष्ट झालेल्या ह्या भिंतींनीं कॉंग्रेसचे संदेश उरावर वाहून लोकांना दाखविले होते ते डिकविण्यासाठीं कित्येकांनीं आपले जीव धोक्यांत घातले होते. त्या भिंतींना वाचा असती तर बाबू दडक्याबद्दल कित्येक आठवणी त्यांना सांगता आल्या असत्या.

गुरुवारीं अन् शुक्रवारीं हा रस्ता निनादून अन् दणदणून जात होता!

गुरुवारची पहाट झाली कीं राष्ट्रीयगीतं कानावर पडत होतीं.

मिरवणूकीचा समुदाय फार मोठा नव्हता. पण तें दर्शन असं होतं कीं पाहाणाराच्या अन्तःकरणावर त्याचा तत्काल अनुकूल परिणाम व्हावा. झेंड्याचें गीत ऐकलं कीं परिस्थितीच्या दाबाखालीं दडपून गेलेलीं मनं खडबडून जागीं होत होतीं.

एक विचारीत होता

' तो झेंडा घेऊन जाणारा मुलगा कोण ? '

' बाबू दडके ! '

' अन् ती पलीकडची पोरगी ? '

' इंपिरियल ब्यांकेचे एजन्ट आहेत ना, त्यांची मुलगी, आकाशी ! '

ह्या साप्ताहिक प्रभात फेरीला शह म्हणून गांवातल्या 'खाकसार' पार्टीचं पथक शुक्रवारीं संध्याकाळीं वाजत न् गाजत निघत होतं. बूट रपरपत होते. तरवारी चमचमत होत्या. ह्या लष्करी 'जुलुशा'चा अर्थ आणि अनर्थ उघड होता. ती अहिंसात्मक वृत्ती आणि हा अत्याचारी आवेश ह्यातून काय निष्पन्न होणार ह्याविषयीं जे ते विचार करीत होते. अन् अनुयायी घटनांची वाट पहात होते !

ह्या आळींत अगदीं कोपऱ्यावरच्या घरांतली वरची तीनखणी खोली कांहीं दिवस बाबूकडे होती. अभ्यासाच्या, आळसाच्या, विचारांच्या अन् विमनस्कतेच्या कित्येक रात्रीं त्यानं ह्याच खोलींत काढल्या होत्या. ' अरे भइ बाबू ऽ ' अशी लखनौकडील सियापंथी मुसलमानांच्या विशिष्ट वर्णोच्चाराची नक्कल करण्याच्या हेतूनं गमतीची हांक मारीत धाडधाड पायऱ्या चढून येणाऱ्या अजीजुद्दीनशी धर्म आणि राजकारणाची जी थोडी बहुत चर्चा त्यानें केली होती ती

इथंच ! पूर्वेकडच्या खिडकीतून पहाट अगोदर ह्याच खोलीत पाऊल टाकीत होती. अन् इकडच्या खिडकीतून पश्चिम क्षितिजाचं फिकट लाल स्वप्न पाहून वृत्तीला एक प्रकारची ध्यानावस्था येत होती.

त्या चैतन्याचा उन्माद आणि त्या उदासीनतेतील काव्य व्यवहारातल्या कोणत्याही गोष्टीपेक्षां फार उन्नत होतं. पण पहिली तारीख आली कीं व्यवहार 'आ' वासून बाबूपुढं येत होता. खोलीचा भागीदार 'पिल्या'–प्रल्हाद घर भाड्याची आठवण करून देत होता. बाबूला तें कधींच वेळेवर देतां आलं नव्हतं. अन् खडाळातल्या ज्या अनेक गोष्टी बाबूला बाधल्या होत्या त्यांत ह्या खोलीचाहि समावेश करायला कांहीं हरकत नव्हती.

हा आतां आला बघा नव्या लोकवस्तीचा भाग !

गेलीं कांहीं वर्षं ह्याच भागांतून बाबू वावरत होता. अन् बरेवाईट अनुभव त्यांनं येथूनच गोळा केले होते. अनाथविद्यार्थ्यांना अनेक नाथ असतात हा बाबूच्या बाबतीत एक सिद्धांत झाला होता. सात ठिकाणीं सात वार लावून राहणारा विद्यार्थी तो ! पण जेवण्याच्या मोबदल्यांत त्याच्या राबण्याच्या शक्तीचा न् सहनशीलतेचा अगदी अंत पाहिला जात होता. अभ्यासाची ईर्षा त्याच्या मनांत नसती तर त्यानं काय वाटेल तें केलं असतं. पण वार लावून विद्या संपादन करणं मात्र सोडून दिलं असतं. सात ठिकाणचे सात नाथ, त्या प्रत्येक नाथाच्या परिवारातले उपनाथ ह्यांची मिजास न् मर्जी सांभाळतां सांभाळतां तो हैराण झाला होता.

शनिवार होता चौधरी वकिलाकडं !

असं सांगतात कीं तिसऱ्या वर्गाच्या वकिली परिक्षेला एकदां

महापूर आला होता. अन् उरलेल्या गाळांतून चौधरी मोठ्या मुष्कि-लीनं वर आले होते, रीतसर सनद घेतली तरी मुकदमे न् मुकदम्यां-तलं यश द्यायला कोण तयार आहे ? गावांतल्या प्रतिष्ठित लोक-वस्तीच्या बहुतेक भागांतून त्यांच्या नांवाची पाटी हिंडत हिंडत अलीकडे ह्या नव्या लोकवस्तीच्या एका खुजट घरापुढं येऊन स्थिरा-वली होती. गेल्या कैक वर्षांत एकाहि अशिलानं तिच्याकडं आपले-पणानं अथवा औत्सुक्यानं पाहिलं नव्हतं. काळाचा कुंचला तिजवर अधून मधून असा कांहीं फिरत गेला होता कीं 'वकील' हीं अक्षरं पाहिल्या मूळस्वरूपांत विलीन झालीं होतीं. 'चौधरी' नांवाला अद्याप कसलाच धक्का लागला नसला तरी त्यावर मोठा उदास पुसटपणा चढू लागला होता. अन् आतां अफू गांजाच्या दुकाना पुढील पाटीइतकंहि तिच्यांत सौंदर्य आढळून येत नव्हतं.

समोर महाळसिंगीकर नांवाच्या एका पोरसवद्या वकिलानं घर केलं होतं. नांव जितकं अवघड तितकंच शरीर किडकिडित. वकिली करायचं त्याचं वय तरी होतं ? काळा झगा घालून मुन्सफीच्या पायरीवर पाय ठेवायला निदान थोडी तरी व्यक्तिमत्ता हवी होती ना ? बाररूम मध्यें सहा तास माशा मारीत अन् पगड्या झाडीत बसणारीं जीं धोंड होतीं, त्यातील ही एक कंगाल भर होती. कायदे कोळून प्यायलले बुढ्ढे वकील कुत्सितपणानं आपसांत म्हणत होते,

'पोरं वकिली करायला निघालीं तर आम्हा म्हाताऱ्यांना हातांत धोपट्या घ्याव्या लागतील. काय चेष्टा आहे कीं काय ! अर्जीदावा (plaint) कशाशी खावा हेंच जिथं कळायची मारामार, तिथं नुसत्या सनदांचा काय उपयोग !'

पण फार दिवस झाले नाहींत. सिंगीकराच्या नांवाचा गाजा-वाजा होऊं लागला. खेडवळ जोड्यांची दारापुढं रीघ लागूं लागली. पायींच कचेरीला जाणारे सिंगीकर आतां स्वतःच्या टांग्यातून जाऊं येऊं लागले. तेंहि अशा थाटानं की, पांच पंचवीस जणांचे नमस्कार व सलाम घेत ! मग पडेल वकिलांचीं पोटं दुखूं लागलीं. चैन आहे बेट्याची असं एक म्हणूं लागला. दुसऱ्यानं नशिबाचा हवाला दिला. उरलेले नुसती कुटाळकी करीत बसले. अन् म्हणूं लागले,

फलाण्याचं दप्तर आयतंच आलं म्हणून आहे हें ! नाहींतर सिंगी-करांचा संन्यासी झालेला आम्हीच पाहिला असता.'

ह्या वैभव आणि उत्कर्षाबद्दल खरा हेवा वाटायला पाहिजे होता तो चौधरी वकिलांना. पण इतक्या जवळ असूनहि सिंगीकरा संबंधीं कांहीं बोलायला ते मुळीच तयार नव्हते. उद्यां महाळसिंगीकर भिकेला लागला अथवा हायकोर्टाचा चीफ जज्ज झाला तरी त्या मुळं चौधरींच्या आयुष्यांत कसलाच बदल होणार नव्हता. असा कांहीं बदल करणारी एकच घटना त्यांच्या पुढं होती. अन् ती म्हणजे इंग्रजी सचित्र साप्ताहिकांतील ( Illustrated Weekly ) कॉमनसेन्स क्रासवर्डचीं कोडीं.

एक विड्याचं बंडल, काड्याची पेटी, तीन चार शब्द-कोष, अन् तें विचार संचालक कोडं असलं कीं, चौधरींची समाधी लागलीच समजा ! झालाच कांहीं अडथळा तर उधारी-वाल्याकडून व्हायचा. पण ह्या आशाळभूत अस्थिपंजर वृद्धाकडून अविश्वासाची अपेक्षा मात्र कुणीच केली नव्हती. आलाच एकादा कुणी जिज्ञासू जवळ तर अमक्या ठिकाणीं हिट ( Hit ). घालावं कीं

हॉट ( Hot ) घालावं यावर चर्चा होई. थोड्याशा शब्दच्छला नंतर चौधरी आपला निर्णय देत, नाहींतर अमक्या नंबरचं कोडं आपण कसं सोडवलं, पैशाच्या अडचणीमुळं तें वेळेवर पाठवितां आलं नाहीं म्हणून त्यामुळं एक फार मोठं बक्षिस आपल्या हातून कसं निसटलं, हें ते सांगत अन् विमनस्क होत. मग जुन्या कोड्याची सारी सोडविलेलीं टिपणं दाखवीत अन् म्हणत देखील कीं, आतां मी परवा जें कोडं पाठविलं आहे, ते हजार हिस्से बरोबर आलंच पाहिजे. मग काय, एका दिवसांत वीस हजाराचा मी धनी होईन. निकालाचा दिवस फार दूर नाहीं आतां अन् मग एक नवी विडी पेटवून ते इतक्या जोरानं झुरका घेत अन् इतक्या जोरानं धूर सोडीत कीं त्यांचे मनोरथ हवेंत खूप वेगानं धावत निघाले आहेत, असं खुशाल समजावं.

आधीच रडूखडू चालणाऱ्या ह्या संसारांत ही कोड्याची खर्चाची बाब आली तरी चौधरी डळमळत नसत.

बाबू सारखा विद्यार्थी ह्या अडचणीच्या संसारात जेऊन होताच. पण मग त्यांत विशेष काय होतं? चौधरी तसे असते तर त्यांनीं आपलं औदार्य अधिक विस्तृत नसतं कां केलं! एक दिवस असा येणार होता कीं, त्यांची मनःशांति ढळविणाऱ्या नसत्या विवंचना अन् अडचणी त्या दिवशी नाहींशा होणार होत्या. चंचल लक्ष्मी आज त्यांच्यावर रुसून पराङ्मुख झाली होती. पण ‘त्या दिवशी’ची, निदान बाबूला तरी फारशी आशा नव्हती. शनिवार आला कीं चौधरींच्या त्या स्वप्नरंजित दिवसाची आठवण होई. आज आपल्याला पहिला तास बुडवून स्टेशनवर “वुइकली” आणण्यासाठीं

जावं लागणार असा मनाशी हिशेब करी. शनिवार असल्यामुळें शाळा सकाळच्या असायच्या. स्टेशनवर जाऊन यायचं म्हणजे पहिला तास खलास व्हायचा. कारण "वुइकली"चा अंक सर्वांच्या आधीं आपल्याला मिळावा म्हणून चौधरी जीव उघड्यावर टाकून बसत. तास बुडाल्याचे बाबूला वाईट वाटल्या शिवाय रहात नसे. पण लगेच त्यांची ती दीन कष्टी मुद्रा, अन् घटकेत चढणारी तर घटकेत विमनस्क होणारी ती स्वप्नाळू छांदिष्ट वृत्ति पुढं आली कीं, जेवण्याच्या मोबदल्यांत एवढी कामगिरी करायला कांहीं हरकत नाहीं असं त्याला वाटे. एका परिक्षेंत मार्क चांगले न मिळाल्यामुळें हा वार सोडावा असं त्याच्या मनांत आलं. तसं हलकेच सुचविल्यावर त्या दरिद्री पण उदार स्वभावाच्या म्हाताऱ्यानं म्हटलं,

"तुझी तशी इच्छा असल्यास माझी ना नाहीं. गेल्या कित्येक दिवसापासून तूं आमच्याकडं येत जात असल्यामुळं एक दोन शनिवार जड जातील माझे. पण केवळ माझ्या दारिद्र्याकडं पाहून तुला जावंस वाटत असेल तर मात्र मला फार वाईट वाटेल. दारिद्र्याचं मला कधींच भय वाटलं नाहीं. तूच भितो आहेस असं मात्र सिद्ध होईल. मी तर तुला मजकडं कायमचा घ्यायला तयार आहे. पण माझ्या घरच्या साध्या आहारांत तुझ्या साऱ्या शक्ती नीट विकसित होणार नाहींत, म्हणून मी तुला तसा आग्रह केला नाहीं बाबू."

पुढं कांहीं तरी ते म्हणणार होते. पण कांहींच न म्हणता तोंड वर करून दोऱ्यानंच एका काडीचं काम भागवित आणलेल्या

चष्म्याच्या खालच्या भागांतून त्यांनीं अशी कांहीं विलक्षण करुण-दृष्टी रोखली होती कीं, ती पाहून वार सोडावा की न सोडावा यातच बाबूचे कित्येक दिवस निघून गेले होते.

रविवारची टिकी होती नाले वकिलाकडे !

नाल्यांचा वाडा कोणता असं एकाद्याला तुम्हीं विचारलंत तर त्या नव्या लोक वस्तीतल्या एका प्रशस्त वाड्या कडं तो बोट करील. एकाद्या नबाबी देवडी सारखं त्याचं स्वरूप नाहीं. थोडासा देशमुखी थाटाचा भकम वाडा. घडीव दगडांच्या चहूकडून जाडजूड अन् लांब रुंद भिंती. बहुतेक लाकडी काम. पितळाच्या फुल्या असलेली ठोकळ फळ्याचीं कवाडं. अशा घराच्या खूप विस्तृत दिवाणखान्यांत एका प्रशस्त लोडाला टेकून बसलेली भव्य स्थूल मूर्ती म्हणजे नाले !

नाले ह्या नांवाला थोडा इतिहास होता. नाल्यावर एक जुनाट पडकं उजाड घर उभं होतं. पुरातन काळीं खडळ्यावर एका विलासी देशमुखाचा अमल होता. काढून आणलेल्या बाया भ्रष्ट करण्यासाठीं अन् त्यांच्या इच्छेला ज्या कोणी वश होत नव्हत्या त्यांना कोंडून ठेवण्यासाठीं अन् झिजवून मारण्यासाठीं त्यानं हे एकटं आणि एकाकी घर बांधलं होतं म्हणे ! भुतांचा वाडा असा पुढं त्याचा लौकिक झाला होता. नाल्याच्या पंजोबानी लौकिकाकडं लक्ष न देतां देशमुखाच्या एका पिढीकडून तो वाडा विकत घेतला अन् निर्भयपणं तिथं वसती केली. त्यांची थोडीशी सावकारी होती. अन् एकाद्याला रकमेची गरज पडली तर माहितगार सांगत होता “ जा, नाल्यावरच्या सावकाराकडे ” ! काळ गेला, घरातील

पिढ्यांचा काळ झाला, घर पडलं. नाला बुजला गेला. पण नाले हें नांव मात्र घराण्याला कायमचं चिकटलं गेलं.

नक्की त्याच पुरातन कालच्या वाड्यावर आतांचा वाडा उभा. वकील साहेबांनीं खूप धन केलं होतं. चालू पिढीतहि वाड्याची एक प्रकारे कीर्तीच होती. हरिदासाचीं कीर्तनं ह्याच वाड्यांत बहुधा ऐकायला मिळत. कीर्तनाला एकादा शास्त्री आला कीं हीच जागा नेहमी निवडली जाई. वेळेवर दुसरी जागा न मिळाल्यामुळं खोळंबून राहिलेली एकादी अराजकीय सभा पार पाडली जाई ती ह्याच जागेत. अन् शिमग्यांत प्रतिष्ठेसाठीं अन् प्रतिष्ठेनं कोल्हाटणी नाचविल्या जात त्या देखील ह्याच वाड्यांत !

हें जरी होतं तरी जागेचा जुना लौकिक ह्या नव्या अमदानींत मात्र अनुभवाला आला होता. घरांत गृहिणी अशी मुळींच टिकत नव्हती. नाल्यांची नाहींतरी सात लग्नं झालीं. घरांत बाळंतीण बाळंत व्हायचा प्रसंग आला कीं, बाळंतीण खलास असा वाड्याबाहेर निरोप आलाच म्हणून समजावा. ह्या उतार वयांतहि नाल्याकडे अद्याप कित्येक वधुपिते आशेनं पहात होतेच. पण खरं सांगायचं म्हणजे लग्नाला नाले कंटाळले होते. अन् आस पास अशी देखील कुजबुज होती कीं, घरांत आहे नाहीं सारं कांहीं पाहणाऱ्या जिजीचा नाल्यांवर फार दाब होता. एकाद्या तरण्या पोरींचं आयुष्य वाया जावं अशी त्यांची म्हणे इच्छा नव्हती !

जिजी !

एक परित्यक्ता अन् फार दिवसापासून नाल्यांच्या आश्रयाला असलेली स्त्री अशी तिची थोडीशी स्थूल माहिती होती. मोठी जहां-

बाज अन् भांडकुदळ बाई ! एकाद्यानं तिच्या विरुद्ध ‘ ब्र ’ काढला कीं, त्याच्या घरीं जाऊन त्याच्या बेचाळीस कुळांचा उद्धार करून त्याची बत्तीशी काढून टाकण्यापर्यंत तिची मजल जात होती.

घरांत सर्वत्र तिचा करडा अंमल. देव देव अन् सोवळं ओवळं कांहीं विचारूं नका ! ‘ मेल्या ’ ह्या संबोधनाशिवाय त्या पोरा सोरांना बोलत नव्हत्या. शिवाशिवी बाबत तर बाबूवर त्यांची फार बारीक नजर होती. विधवेचं वाण म्हणून त्याच्या विषयीं झिडपिड फार. ही कजाग अन्नपूर्णा मोठी धार्मिक म्हणून बाबू प्रथम प्रथम तिच्याकडं आदरानं बघे. रविवारीं रात्रीं नाल्याचं अंग दाबण्याची एक कामगिरी त्याला करावी लागे. पलंगावर अडवी तिडवी पडलेली ही स्थूल देही व्यक्ती सहजासहजीं झोपी जाईल हें शक्य नव्हतं. दीड दोन तास तें शरीर तुडवायचे म्हणजे हात गळून जायचे. कुठं आकरा साडे आकराला कसलसं चाटण घेऊन जिजी यायच्या अन् म्हणायच्या,

होरे मेल्यां खाली आतां !

आणि नंतर वर केलेले मच्छरदाणीचे पडदे खाली झालेले दिसले कीं, नाल्यांनीं न् जिजीनीं आपल्या साऱ्या धार्मिक वृत्ती अन् नैतिक बंधनं पलंगाच्या पडद्याबाहेर भिरकाऊन दिलीं असं खुशाल समजायला कांहीं हरकत नसे !

सोमवारच्या कहाणीचे नायक नीळकंठराव सोळनेरकर !

आपण कुठल्याशा हपिसांत हेडक्लार्क होते. साहेबाबरोबर निसर्गाचाहि त्यांच्यावर वरदहस्त होता. अनुभवानंतर असं सिद्ध केलं होतं कीं, साहेबापेक्षां निसर्गच अधिक उदार. पगारवाढ दोन

वर्षांनीं एकदां मंजूर होऊन गेली होती. एवढ्या कालावधींत घरांत घेतलेला पाळणा हलून जात होता. वाढत्या संसाराच्या दगदगींत सोळनेरकराची परोपकार बुद्धि फार जागृत. बाबूसारख्या निराश्रिताला एक दिवसापुरता कां होईना त्यांनीं आश्रय दिला होता. थकव्याच्या विश्रांतीला सारा दिवस पुरतील इतकं घरात काम होतं. ऐंशी ऐंशी गॅलनचे काय ते एक दोन पिपे नळाच्या पाण्यानं भरून काढायचे. बाबालोकांना सांभाळायचं, शाळेत पोचवायचं. स्नानाच्या नांवाखालीं कसंतरी अंग खळबळून अन् नेसू कसंतरी गुंडाळून चुलीपुढं मोठ्या नाखुषीनं बसलेल्या यजमानीण बाईंना वरचं काढून द्यायचं. पाटपाणी करायचं काय एक की दोन !

बाबू हें सारं करीत होता. ह्या त्रासांत आणखी एक उपाधी होती. ती म्हणजे हेडक्लार्क साहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव श्याम ! गेल्या पांच सहा वर्षांपासून तो मॅट्रिकच्या वाऱ्या करीत होता. परिक्षकांची कुठं कसली चूक होत होती, कुणाला माहित. निकालाच्या फळकावर दरवर्षीं त्यांचं नांव हटकून गाळलं जात होतं. आतां शाळेच्या न् अभ्यासाच्या भानगडी त्याला सोसवत नव्हत्या. बेधडक आजाराचं सोंग घेऊन 'लंडन येथील बड्या लोकांचीं गुप्त कृत्यें' तो वाचीत पडत होता. अन् त्यांतलं एकादं आपल्याला जमतं कां हें पहात होता. बाळ गुणी होतं, ह्याची हेड क्लार्कला जाणीव होती. पण पोटचा मुलगा. कुठं बोलून दाखवितां येत नव्हतं. त्याची बाहेर स्वतंत्र उधारी होती. अन् ती साळनेरकरांना दर महिन्याला मिटवावी लागत होती. ह्या उधारी मुळं बाहेर जाणं बंद झालं कीं, बाबूला कित्येक वेळां त्याला सिगारेट्स आणून द्याव्या लागत. अन् सोमवारीं

बाबू जेवून शाळेला निघाला कीं, ही वेळ हटकून आल्याशिवाय रहात नसे !

तोंडी ओळख घेऊन वार लावण्यासाठीं बाबू पहिल्यांदाच या घरांत आला तेव्हां शाम अष्टावधानं नाहीं तरी चार पांच अवधानं साधीत होता. तो आरशांत पाहून केस वळवीत होता. सिगारेट ओढीत होता. अन् ती ओढतां ओढतां गुणगुणत होता. चाहूल लागल्याचा भास होतांच त्यानं भिंतीला झरकन् सिगारेट घासली अन् समोर पाहिलं. उगीच आपण भ्यालों अशी खात्री पटल्यावर 'कोण ?' म्हणून त्यानं विचारलं.

'मला हेडक्लार्क साहेबांना भेटायचं आहे'! बाबूनं म्हटलं. श्यामच्या प्रश्नाचं त्याला हवं होतं तें हें उत्तर नव्हतं कीं काय कोण जाणे ! गळ्यातल्या मफलरीचा पुढं पडलेला एक पदर त्यानं झटकन् लपेटून घेतला होता अन् विचारलं होतं,

'काय काम आहे ?'—

ज्याला भेटायचं होतं तो हा पोरकट दिमाख नाहीं हें बाबूनं ताडलं होतं. कामासाठीं एखाद्या माणसाच्या घरीं आल्यावर दुसऱ्याच एखाद्या मधलोबाला सारा इतिहास आणि वर्तमानसार सांगून टाकण्याची वेळ यावी म्हणजे एक कडक शिक्षाच नव्हती तर काय ? त्या उसन्या झोकाला तडाखा देण्यासाठीं बाबूनं उत्तर दिलं होतं,

'आपणास सांगण्यासारखं नाहीं तें... !' मग दाराबाहेर कांहीं वेळ तो घोटाळत राहिला होता. त्यानं वळून श्यामकडं पाहिलं असतं तर केवळ्या अधम शक्तीला आव्हान देऊन तिच्या आसपास आपण फिरकतों आहों अन् पुढं फिरकावं लागणार, याची त्याला कल्पना

आली असती....! '

भौमवारची पोट पूजा अशा ठिकाणीं होती की जिथं शांति आणि मंगल त्याच्या आधींच ठाण देऊन होते.

घरधन्याचें नांव सोनफुले. ते एका खाजगी शाळेत फर्स्ट असिस्टंट होते. मास्तर अन् तशांतहि खाजगी शाळेचा म्हटल्यावर मग काय विचारता! एक काळ असा येऊन गेला कीं सोनफुले हें नांव वर्तमानपत्रांतून ठळक अक्षरांत झळकलं होतं. कांग्रेसच्या सत्ताधारी गटांतील कांहीं माणसांनीं त्या नांवाची अन् नांवकऱ्याची चौकशी केली होती. तो काळ १९३० चा होता. ह्या शेवटच्या शून्यातून कांहीं संवत्सरं बाहेर पडलीं नाहींत तोंच सोनफुले एका खाजगी शाळेत मास्तर झाले होते, अन् एका अंधाऱ्या कोपऱ्यांत जीव जगवित पडले होते. पेंचदार परिस्थितीवर मात करतां न आल्यामुळं एखाद्या जिवंत विचाराच्या अन् कर्तृत्वशाली माणसाचं प्रेत पाहिल्यावर वाटावं त्यापेक्षां निराळे विचार आताच्या सोनफुल्याकडं पाहून येत नव्हते.

जिथं राष्ट्रीय विचारांचीं प्रतिकं निर्माण करतां येतील अशा अर्थाचे, तळमळीचे अन् तपश्चर्या करण्याची तयारी दर्शविणारे शब्द एकाकाळीं ज्या आवाजातून बाहेर पडले होते तोच आवाज शाळेत नौकरी करण्यासाठीं येणाऱ्या एखाद्या नवख्या उमेदवाराला सांगत होता,

" मिळालीच एखाद्या वेश्येच्या घरीं नौकरी तर ती आनंदानं पत्कर. पण खाजगी शाळेचा मास्तर होऊन आयुष्याचा विचका करूं नकोस! राष्ट्रीय कार्य आणि त्याग हे शब्द मनाला उत्स्फूर्त

करणारे असले तरी प्रत्यक्षाशीं त्यांचा मेळ सरळ बसत नाहीं. गल्ली-तलीं चार पोरं जमा करून सरकारी शिक्षणक्रम त्यांच्या घशांत उतरावयाचा, या खेरीज खाजगी शाळांना कांहीं अर्थ नाहीं. ध्येयवादी माणसांना अर्धपोटी राबवायला हें चांगलं ठिकाण आहे. कमी पगारावर मास्तरांना अर्धपोटी अन् उपाशी मारून त्यांच्याकडून जिवंत विचारांची अपेक्षा करणं चूक होणार नाहीं? तुझे तरणे विचार एखाद्या महारवाड्यात उबव. पण ह्या भुकेकंगालाच्या घोळक्यांत येऊं नकोस!"

सोनफुल्यांचं कौटुंबिक जीवन यापेक्षांहि तलखीचं अन् हलाखीचं होतं. तिथं वडीलधाऱ्या आश्रयांतली निर्भयता नव्हती. चुंबनंच नव्हतीं तेव्हां चोरटेपणाला कांहीं वाव मिळण्याचा संभव नव्हता.

कोवळे चित्कार कधीं कानावर पडत नव्हते. मृत्यूचे हुंकार मात्र ऐकू येत होते!

दम्यामुळं मास्तरांच्या वडिलांना आंथरुणावरून देखील धड हालचाल करतां येत नव्हती. कित्येक दिवस आणि कित्येक रात्री ह्या अंथरुणाच्या उशापायथ्यावरून सरकल्या होत्या. पण मृत्यूच्या संहारक क्रियेतली शेवटची क्रिया गळ्यापर्यंत येऊन पुन्हां परत जात होती, अन् त्या सुकलेल्या कुडीतून पुन्हा श्वास खेळत होता. चितृशक्तीची न् विलयाची ही झटपट आणखी किती दिवस चालणार होती कुणाला ठाऊक!

बायको संधिवातानं लुळी होऊन पडली होती. ह्या आजाराला कंटाळून, जें थोडं थोडकं बोलतां येत होतं तेहि अलिकडं तिनं सोडून दिलं होतं. निष्प्राण पडून राहण्याचा ती सराव करीत होती.

पण जिन्यावर पाऊल वाजलं कीं, पापण्यांच्या झापडीतून प्राण-ज्योतीला क्षणभर प्रकाश चढत होता! मास्तरांची कर्तव्यदक्षता इतकी अढळ होती कीं डोळ्यांपुरताच प्राण उरलेल्या ह्या दोन कुड्या कधीं कदाचित् म्हणतहि असाव्या

" मित्रा आजवर करित आलास तसं आणखी एक सत्कृत्य कर. एक दगड घे अन् कर आम्हाला मोकळं. ह्या जिवंतपणाच्या यातना मात्र आतां नाहीं सहन होत !........

बाबू वारासाठीं आला तेव्हां सोनफुल्यांनीं घरची परिस्थिती त्याला दाखविली, समजावून सांगितली, अन् सरळपणानं म्हटलं,

' एका अनाथ विद्यार्थ्यावर मी उपकार करतो आहे, अशी माझी मुळीच समजूत नाहीं. ह्या दोन जिवांनी ऐहिकाचा मोहच सोडला आहे म्हणून खाण्यापिण्याचा विशेष तुटवडा नाही. रोज हातानं करावयाचा कंटाळा आला आहे. मंगळवार तुला हवा असेल तर तुलाच आपल्या हातानं स्वयंपाक करावा लागेल ! '

बाबूनं ह्या परिस्थितीचा स्वीकार केला होता. ह्या घरांतून संसाराचं मोठें भीषण स्वरूप त्याला दिसत होतं. सोनफुले आपल्या आठवणी अन् विचार बोलून दाखवित होते तेव्हां तो अगदीं तन्मय होत होता.

स्मशानांत निघणारे सारंगीचे सूर अन् सोनफुल्यांचं अंतर्जीवन ह्यांत विशेष कांहींच फरक नव्हता !........

बुधवार डॉक्तर गाजऱ्यांच्या घरीं !........

डॉक्तराच्या मिळकतीला अलीकडं कांहीं प्रमाण उरलं नव्हतं. घरांत टायपीस्ट, सुव्यवस्था सारं कांहीं होतं. पण··देण्याघेण्यांत

अन् खाण्यापिण्यांत चारकाई फार. बाबू जेवायला बसला कीं चष्मा वापरणाऱ्या अति गोरट्या बाई रोखून पहात होत्या. चमत्कारिक नजरेखाली बाबूला धडपणें कधींच जेवतां आलं नव्हतं. दीड चपाती अन् पुढचा मागचा भात झाला कीं, ढेकर देणारीं माणसं तीं. बाईच्या अन् बाईच्या 'तिकडच्यां'चा दोन वेळेचा आहार बाबू जणूं एकाचवेळीं फस्त करित होता!

बाई धड सुंदर ना असुंदर. एखाद्या सुगृहिणीकडे पाहून वाटावा तसा आदर बाबूला कधींच वाटत नव्हता. उलट एक प्रकारची धास्ती मात्र त्याच्या मनानं घेतली होती. ह्या धास्तीत आणखी बेबीचा अन् बेबीच्या शिकवणीचा बलात्कार!

बेबीला केव्हांच चांगली वाढ आली होती नी गोल नेसत होती, केसांची तऱ्हेतऱ्हेनें रचना करीत होती. पिन्स आणि आकडे किती लागत असतील ह्याची मोजदाद नव्हती. अन् सकाळीं बाबू दिसायला जरा कुठं उशीर झाला कीं, बाजारांतुन फुलं आणून द्यायला त्याला हुकुमी आवाजांत ती सांगत होती. कारण वेणींत फुल घातल्याशिवाय शाळेत जायचं तिला कससंच वाटत होतं. ह्या आवऱ्या गोबऱ्या पोरीच्या प्रसाधनानं कुठं कोणत्या राजकुमाराचे अन् कुठं कोणत्या राजवाड्याच्या सौधावरून डोळे निवून जाणार होते, कोणजाणे!

सरस्वतीचं अन् तिचं मुळीच सख्य नव्हतं. होमवर्क करायचं झालं कीं वहीचे कागद ती खराब करीत होती. शाईचा डाग अन् अक्षरांच्या कांड्यांनीं तीं कोरीं करकरीत पानं चिडविडून गेलीं कीं ती खुशाल वह्याच्या वह्या टरकावित होती. बाबू आला कीं न

समजणारं अन् न लिहिता येणारं त्यानं समजावून सांगावं अन् लिहून द्यावं. म्हणून ती आईतर्फे सूचना करी. आईच्या त्या चाळिशीच्या नजरेला नकार देणं बाबूला शक्य नव्हतं! एक दोन दिवसापुरता हा त्रास नव्हता. बेबीचा जवळ जवळ तो घरचा शिक्षकच झाला होता म्हणा ना! शिष्येची शिकण्याची तऱ्हा किती विचित्र! ती फालतू शब्दांचे अर्थ खोदून खोदून विचारीत असे. जांभया नाही तर आळोखे पिळोखे देई. समोरच्या घराच्या गॅलरीकडे चोरून बघत होती. अन् मध्येंच एकदम 'पुरे आता' म्हणून पुस्तक टेबलावर भिरकावून घाईनं माडीवर निघून जात असे. तिच्या अशा तऱ्हेवाईक कृत्याचा अर्थ समोरच्या गॅलरीतल्या मुला-कडं पाहून बाबूला कळून यायला फारसा वेळ लागला नव्हता! खडाळ्याच्या हस्तलिखित वाङ्मयीन जगांत कवि 'रान गुलाब' नांवानं ख्यात असलेली वल्ली ती हीच. गडी नुसतीं प्रेमगीतं नी रानगीतंच रचित नव्हता तर लघुकथा अन् लघुतमकथाहि खरडीत होता. ह्या मराठी उमरखय्यामची 'रुबाया' म्हणजे 'बेबी'. आधीं आधीं नुसत्या डोळा भेटीवर आणि खाणाखुणावर जगूं लाग-लेल्या ह्या प्रेमाला चिठ्ठीचपाटींचे अलीकडं पंख फुटूं लागले. अन् एकदा तर त्यानं घातलेलं एक गुलाबी कोडं बेबीच्या पुस्तकांत बाबूला आढळून आलं.

प्रिय बेबी,

'टिचकीतला' च ' घेऊन, तुझ्या चुकार लटांतला त्याला 'उ' कार जोडून, अर्थ पूर्तीसाठीं तुझ्या हनवटीवरला बारीक तीळ त्यावर ठेऊन, गुलाबाच्या सुगंध आणि सौंदर्याचा प्रत्यय येण्यासाठीं,

त्यातला नुसता 'ब'कार घेऊन मग तुझ्या नेत्रातल्या 'न'कारावरच ज्याचा शेवट होईल असं इथं कांहीं लिहिलं आहे असं समज ! !

पुढच्या परिच्छेदांत प्रेमाची आणखी कसकसलीं गूढं होतीं हें पहाणं बाबूच्या मनाला प्रशस्त वाटलं नव्हतं.

ह्या जुलमाच्या शिकवणीसारखं गुरुवारी आणखी एका जुलुमाला बाबूला तोंड द्यावं लागलं होतं. ' यशवंतराव खुशाल ' ही अशी व्यक्ती होती कीं चारचौघांत नेहमी जिची ' आवजाव ' होत होती अन् नांव निशाण निघत होतं. कांहीं माणसंच अशी असतात कीं, समाजानं त्यांचं स्वागत करावं अशी त्यांची मुळीच लायकी नसते. त्यांना राजकारण कळत नसतं. एकादं सामाजिक कार्य करतील अशी त्यांच्यांत धमक नसते. पण आपण त्यांतलेच आहोंत असं जगाला भासविण्याची त्यांची अहोरात्र धडपड असते. यशवंतराव खुशाल अर्थात् असेच होते.

एकादी राजकारणी सभा असू द्या. सामाजिक विषयावर चर्चा होऊं द्या. नियोजकाकडून निमंत्रितांची जी यादी व्हायची त्यांत खुशालांचं नांव कधींच चुकून रहायचं नाहीं. गाणं कशाशी खातात हें यशवंतरावांच्या कैक पिढ्यांना माहीत नव्हतं. पण घरांत मात्र पायपेटी धूळ खात होती. एका भारी कापडाच्या सोजणीत तबला बांधून ठेवला होता. मात्र कुठं एकादी गाण्याची बैठक झाली कीं, प्रतिष्ठितांसाठीं जे लोड मांडले जात होते त्यांत खुशालांसाठीं एक राखून ठेवला होता.

सरकारी दरबारीं देखील खुशालांचं वजन. गांवांत हिंदु-मुसलमानांची तेढ वाढूं लागली कीं, समेटासाठीं पंचाची जीं नांवं पुढं

केलीं जात होतीं त्यांत खुशालांचं नांव हटकून असायचं. खुशाल वकील होते हे एक आणखी आश्चर्य होतं. त्यांच्या पार्टीइतकी चमकदार पार्टी गांवांत दुसरी नव्हती. त्यांची वकिली चालत नव्हती कीं ती ते चालवायला तयार नव्हते, हा प्रश्न वेगळा होता. पण मुनसफीत जाऊन यायला मात्र ते विसरत नव्हते. पूर्वीं महिन्यातून एक चक्कर व्हायची. आतां अलीकडं मोटर आल्यापासून ते रोज कचेरीला नियमानं जात होते. अन् लहर लागेल तेव्हां परत येत होते. ऐश्वर्याला मुळींच कमतरता नव्हती. त्यांच्या वयाला थोडी तरुणच शोभेल अशी घरांत सुंदर आणि गृहदक्ष पत्नी होती. नवराबायकोचं निरतिशय प्रेम असा लौकिक होता. त्या लौकिकाला कसलं पाठबळ असेल ते असो. बाबूला त्याविषयीं मात्र विचार करावा लागला होता. तो अकारण नव्हे तर तसं कांहीं अविचारी पाहिलं न् प्रत्ययाला आलं म्हणून !

बाबू मधल्या सुटींत जेवायला आला कीं असे कित्येक प्रसंग येत कीं सौभाग्यवती खुशालांचे वस्त्रांचे संकेत थोडेसे विस्काळित होत. स्त्रीचं शरीर हीं काय चीज आहे हें न कळण्याइतका तो अज्ञान नव्हता. ह्या प्रासंगीक असभ्यतेनं त्याचं मन विचलित होत नव्हतं तो एक अनाथ विद्यार्थी होता अन् ती अन्नदात्री होती, ही भावना कमालीची बळकट होती.

हळूं हळूं यानंतरचा क्रम होऊं लागला. बाबू आला कीं पलंगावर पडलेल्या सौ. खुशाल 'आह अगबाई' असं कांहीं करीत. अन् 'कसा रे तू असा' म्हणून त्याला माजघरांत ओढून नेत न् पाटावर बसवीत !

तो निष्पाप क्षुधाक्रांत ह्या विलासिनीच्या आळसाचा चमत्कारिक आविष्कार पाहून थक्क होऊन जात असे. सुग्रास भोजन आणि निवांत वामकुक्षीनंतर आलेली एकलकोंडेपणांतली ती एक क्षणिक पण विलक्षण लहर होती, कीं एकाद्या वाढत्या अतृप्तीच तें प्रगट स्वरूप होतं, कांही कळत नव्हतं !

शुक्रवारचं काय विचारतां ? घरांत इनमिन दोन माणसं ! तेथल्या बँकेचे एजन्ट राजश्री सोनोपंत अन् स्वयंपाक घराच्या पगारी संचालिका गं. भा. राधाबाई ! राधाबाई पगारी होत्या हें त्या दर शुक्रवारीं हटकून विसरत होत्या. बाबू आला कीं, हें उचल, तें ठेव, हें ने, तें आण, असं त्यांचं सारखं चालायचं. सोनोपंतांना म्हणे कुणी नातेवाईक होते. पण ते कुठं कोणत्या देशांत होते कोण जाणे ! घरांत 'आकाशी' ह्या नांवाच्या कैक खुणा आढळत होत्या. किशी, काशी, बत्ताशी, अन् कैलासी अशीं कांहीं नांवं बाबूनं ऐकली होतीं, पण 'आकाशी' हें नांव मात्र नवं वाटलं होतं. घरांत भरत-कामाचे अन् इतर कलाकुसरीचे जे नमुने टांगले होते त्या प्रत्येका-खालीं रेशमी दोऱ्यांत वीण आढळत होती.

'आकाशी' !

त्यानं तिच्या अभ्यासाच्या खोलींत एकदा सहज प्रवेश केला होता. बेबीची अभ्यासाची खोली त्यानं पाहिली होती. पण त्या आणि ह्या खोलीच्या सजावटींत, वस्तूंत, वस्तूंच्या रचनेंत, निवडीत अन् त्या हाताळणाऱ्या पद्धतींत फार मोठा फरक त्याला आढळून आला होता. कुतूहलाचे अन् रम्याभासाचे असे कांहीं नाजूक हिसके त्याच्या मनाला बसले होते कीं, ही 'आकाशी'

कोण कशी असावी हें पहाण्याची मोठी तीव्र उत्कंठा त्याला लागली होती.

पण कसली 'आकाशी' अन् कसचं काय? सोनोपंताच्या गैरहजेरींत त्याचा न् राधाबाईचा खटका उडाला. ती माऊली त्याला नाहीं नाहीं ते बोलली अन् स्वतःच्या अधिकारानं तिनं त्याला घरीं यायची बंदी करून टाकली!

मग शुक्रवारीं तो लंघन आणि लंघन चिकित्सा करूं लागला.

अशा रगाड्यांत बाबूच्या शिक्षणाची हाव कायम होती. सरस्वतीनं त्याच्यासाठीं जणूं कांहीं हट्टच धरला होता.

बाकीच्या कांहीं अनाथ विद्यार्थ्यांचं मात्र फार मजेंत चाललं होतं. ते लौकिक अर्थानं अनाथ होते. पण राहात होते असे कीं त्यांच्या थाटामाटाकडं पाहून संस्थानिकांच्या मुलांनीं देखील शरमेनं माना खालीं घालाव्या.

प्रल्हादधनाचंच उदाहरण घ्या ना? त्याचा दूरचा एकुलता एक कुणी तरी नातलग कुठल्याशा एका तालुक्याच्या गांवीं मारवाड्याच्या दुकानावर वहिखातं लिहायला होता. पिलोबाला पंख फुटेपर्यंत त्यानं वाढविलं होतं. अन् पंख फुटल्यावर सरस्वतीच्या वनांत वावरण्याचं मिष करून पिल्या मदनाचीं राज्यं उध्वस्त करूं लागला होता.

त्याला साऱ्या कला थोड्या फार अवगत होत्या. त्याचा आवाज गोड होता. त्याला गातां येत होतं. स्थानिक गवयांच्या बैठकींत तो बसला तर चांगलाच ठेका धरतां येईल अशी तबल्याची त्याची तयारी होती. एवढंच नव्हे तर परगांवचे कुणी गायक आले

तर त्याचं गाणं कोणत्या गोटांत होणार याची बित्तंबातमी आधी धनाला लागत होती. तबला पेटी मिळवून आणणारांना तो केवढ्या आपुलकीनं मदत करीत होता. निमंत्रण नसलं तरी साथीदारांच्या घोळक्यांत आत्मविश्वासानं घुसत होता. अन् मोठ्या पेटींत बसत होता.

शाळेच्या हजेरी पटावर त्याचं नांव होतं इतकंच. पण नांवापुढें नेहमी गैरहजेरीच्या खुणा असायच्या. हा शाळेत आलाच तर एखाद्या उत्सवाच्या वेळीं. अन् तेहि हेडमास्तरांच्या सूचनेवरून प्रारंभींच नमन म्हणायला !

श्रावण भाद्रपद महिन्यांत तर पिल्याला मरायला फुरसत नसे. मेळ्यासारखं सार्वजनिक स्वरूपाचं कार्य इतक्या तळमळीनं करायला दुसरा कोण तयार होता? स्थानिक कवींना पदरमोड करून तो चहा पाजीत होता. गाण्याच्या चाली सांगून पद तयार करवून घेत होता. संवाद बसवित होता. अन् मुलींना आणायची, न्यायची, निवड करायची, शिकवायची अन् त्यांचा रुसवा काढायची दगदगीची अन् अवघड कामगिरी करायला त्याच्या इतका दुसरा कुणी लायक नव्हता ! मेळ्याचा अलविदा व्हायच्या दिवशीं, व्यासपीठावर चढायचा ज्याला कधींच मान मिळाला नाहीं, अशा एका अध्यक्षाकरवीं पदकांची जी खैरात व्हायची त्यांतलीं कित्येक पदकं धनाच्या खर्चातूनच तयार झालेलीं असत. घरून एखादी मनिऑर्डर तर सोडा पण साधं कार्ड देखील त्याला कध्धीं येत नव्हतं पण पिल्याच्या चैनींत मात्र जरा देखील कमी पडत नसे वासाचं, भारी किंमतीचं तेल डोक्याला चोपडल्याशिवाय आणि खिशांत लहानसा आरसा आणि कंगवा बाळगल्याशिवाय तो बाहेर पडत नव्हता. पडल्यावर

रेशमी रुमालानं पुन्हपुन्हा तोंड पुसण्याचा आविर्भाव करीत होता. तो सिगारेट ओढीत असे–सिनेमा पाही अन् नाना रंगढंग करीत असे. कोणत्याहि हॉटेलांत त्याला वस्तु उधार मिळण्याची पंचाईत नसे. अन् बाहेर वार लावून जेवणाराची ही चैन चालत होती, हें केवढं आश्चर्य होतं. पण हें ज्या मार्गानं चालत होतं ते मार्ग बाबूला मुळींच पसंत नव्हते !.....................

त्या तीनखणी खोलींत दोन वळकट्या होत्या. माणूस जें जें कांहीं वापरतो, अंगावर चढवितो, अथवा जवळ बाळगतो त्या त्या वस्तूंना निरखून अथवा झटकून पाहिलं तर त्या वापरणाऱ्याच्या व्यक्तित्वाचा अन् विचारांचा माग लावणं कांहीं कठीण नाहीं. रंगावरून एक भडक दिसत होती. दुसरीच्या साधेपणाला कांहीं सीमा नव्हत्या. एकीचा विलासी मामला होता. दुसरीचा रोखठोक फकीरी बाणा होता. आठदहा दिवसाला धनाच्या बिछान्यांतून एखादा आकडा निघाला नाहीं असं कधींच होत नव्हतं ! तें झटकलं असतं तर धनाच्या न घडलेल्या चारित्र्यावरील पुटं अन् विकारांच्या उद्यापनाचा असा कांहीं खकाणा बाहेर पडला असता कीं, खडाळ्यातील कित्येक शिलांचे आदर्श दुभंगून गेले असते !

दिवस येत होते. बाबू दिवसाबरोबर स्वत्व सांभाळून चलूं लागला होता. ह्या अंतर्बाह्य तसायुष्यांत आकस्मिक एकदां गार शिराळं आलं !

शुक्रवार होता. एक शिकवणी संपवून श्रमानं न् अनशनानं सुकलेलं तोंड घेऊन बाबू घराकडे परत येत होता. समोरून सोनोपंत येताना दिसले. बाबूच्या नमस्काराचा स्वीकार केल्यावर बोलणं आव-

श्यक म्हणून कीं काय कोण जाणे त्यांनी थांबून विचारलं !

" अरे ? आतांशा येत नाहीस आमच्याकडं ! "…….

उत्तर द्यायला बाबूजवळ चांगली कारणं नव्हतीं.

" कुठं दुसरीकडं वार लावलास ? "

" नाहीं ! "

" मग ? "

बाबूला राधाबाईंचा नाइलाजास्तव उल्लेख करावा लागला होता. सोनोपंतांना तें पटलं होतं. मात्र त्यांच्या कानावर ही भानगड न घातल्यामुळं त्यांनीं थोडंसं प्रेमळपणानं दटावलं होतं अन् संध्याकाळीं येण्यासाठीं बजावून ते पुढं निघून गेले होते.

रात्रीं जेवून बाबू खोलीवर आला होता तो गुंजत आणि गुणगुणत ! तें पाहून धनानं विचारलं, " फार वेळ केलास आज ? "

" कां, तुझ्या वेळेत कांहीं विघ्न आलं कीं काय ? "

" माझं सोड ! कुठं होतास इतका वेळ ? बेबीकडं ? "

" बेबी म्हणजे कांहीं माझं वेळ घालवायचं साधन नाहीं ! "

" नसेलही ! पण आजचा तुझा नूर कांहीं निराळाच आहे ! "

आणि खरंच तो थोडासा निराळा होता. कित्येक शुक्रवार त्यानं उपाशी काढले होते अन् आज त्या उपासांचा शेवट झाला होता. त्या निराहारांची समाप्ती इतक्या चांगल्या रीतीनं होईल अशी त्याला कल्पना नव्हती. जणूं काय आज त्याच्या तरण्या मनाला साक्षात्कार झाला होता ! जणूं कित्येक दिवस कसल्या तरी नितांत मधुर आशयाची तो प्रतिक्षा करीत होता आणि तें आज त्याला आकस्मित साकार आणि भावपूर्तीच्या मिषानं अवतरलेलं

दिसून आलं होतं! लौकिक व्यवहारानं विद्ध होऊन यौवनातील कांहीं पाऊलं त्यानं टाकलीं होतीं. अन् तोंच सभोंतालच्या संसारातील क्षुद्र बुजबुजाटांतून वर पहायला लावील असं त्याच्या नजरेस पडलं होतं. ती अनुभूतीच अशी होती कीं कित्येक रसाळ कवितांना तिनं जन्म दिला होता, कित्येक रिकामीं मनं तिनं भरून काढलीं होतीं, अन् निराश जीवनाला अलंकृत केलं होतं!........

मग शुक्रवार भरभर येऊं लागले अन् त्याच्या मनावर निरनिराळे ठसे उमटवित निघून जात होते.

बँकरच्या घरांत त्याची वाट पाहिली जात होती. दारांत पाऊल पडलं कीं सस्मित स्वागत होत होतं. निळसर रंगाच्या दोन दोन बिलवरांनीं सजलेले कोवळे सुवर्णाचे हात त्याच्या पुढं येत होते. प्रेमळ घराऊ आग्रह होत होता. चहाला न् फराळाला आग्रहाचं निमंत्रण दिलं जात होतं सहा दिवसांचा मनस्ताप शुक्रवारीं सकाळीं नाहींसा होत होता. त्या प्रत्येक क्षणाला कांहीं अर्थ होता. मनोमन स्मृतींना टिपून घेतां येतील असे कित्येक अवसर दिवसाकाठीं उरत होते.

अन् अशा तऱ्हेनं आकाशीनं त्याच्या आयुष्यांत प्रवेश केला होता!

एकदां घरीं येतांच बाबूनं आकाशीच्या आईला आपणहून वर्दी दिली होती,

"बाई! मी चहा सोडला!"

"केव्हां पासून?"

"आज गांधी जयंती ना! शपथ घेतली आहे मी चहा न घेण्याची!"

हा निश्चयाचा प्रकाश आणखी दोन डोळ्यांनीं न्याहाळला होता. यौवन त्यांतून झळाळूं लागलं होतं. अन् जयंतीच्या दिवसापासून आणखी एक चहाचा कप कमी झाला होता.

" बाबू ! " एके दिवशीं आकाशीनं विचारलं, " बेबीकडे येणारा पेटी मास्तर तुझ्या ओळखीचा आहेना ? "

" हो, प्रल्हाद धन कां ? "

" मला पेटी शिकायची आहे ! "

डावीकडचा जिवणीचा भाग आणि नेत्र किंचित् संकोचित करीत बाबूनं तिरस्कृतीचा एक हुंकार काढला होता. तिच्या पेटी शिकण्याच्या इच्छेला विसंगत असलेला हा स्वर तिनं ओळखला असावा.

" मी पेटी शिकूं नये, असं तुला वाटतं ? "

" असं मुळींच नाहीं ! पण केवळ बेबी पेटी शिकते म्हणून तुला शिकाविशी वाटते अन् पेटी शिकण्यांतच तुला इतिकर्तव्यता वाटत असेल तर मला कांहींच सांगायचं नाहीं. माझ्याच मतावर तुझं शिकणं न शिकणं अवलंबून असेल तर मात्र सांगतो. आकाशीनं पेटी शिकावी, सभा संम्मेलनांत अथवा आप्तेष्टांच्या बैठकींत ती वाजवून दाखवावी, अन् स्तुत्योद्गारांत त्याचा शेवट व्हावा, हें दृष्य अथवा ही कल्पना मला विशेष आकर्षक वाटत नाहीं. दुसरं पुष्कळसं तुला करतां येण्यासारखं आहे. तुझ्या वयाच्या इतर मुलींपेक्षां तूं अधिक समंजस आणि शिकलेली आहेस ! विचार करून बघ. नाहींतर मी मार्ग सांगतोच ! "

एका पांढरपेशा वर्गातली स्त्री देवळातून परत येत असतां कांहीं गुंडांनीं तिच्याशी असभ्य वर्तन करण्याचा प्रयत्न केला. तिला पळवून

न्यायच्या ते बेतात असावे. गांवांत ही बातमी दबकत ऐकली आणि सांगितली जात होती. एका सभ्य स्त्रीची अब्रू उघड्यावर पडूं नये हा त्यांत हेतू होता. पण गुंडांना शासन करण्याचे विचार मात्र कुणीच बोलून दाखवित नव्हता, अर्थात् ह्या प्रकरणाची प्रतिक्रिया स्तब्ध बसण्यांत झाली. अन् एकट्या दुकट्या स्त्रीला बाहेर जाण्याची प्रत्येक घरांतून मनाई करण्यांत आली.!

आकाशीनं व्यायाम शाळेच्या पथकांत आपलं नांव नोंदविलं.

स्त्रियांची व्यायामशाळा म्हणजे मुलांच्या आखाड्यालाच जोड-लेला एक भाग होता. परगांवच्या प्रतिष्ठित पाहुण्याला इथं मुलींची व्यायामशाळा आहे हें सांगण्यापलीकडं त्या राखीव रिकाम्या जागेला कांहीं महत्त्व नव्हतं. वार्षिक उत्सवाच्या वेळीं स्त्रियांना बसण्यासाठीं त्या जागेचा उपयोग होता. नाहींतर संक्रांत झाल्यावर तिथं हळद्याचीं प्रदर्शनं भरत होतीं, बक्षिसं वाटलीं जात होतीं अन् मग पुढच्या संक्रांतीपर्यंत ही स्त्रियांची व्यायामशाळा खलास होत होती. नियमानं आल्याच तर कांहीं परकरी पोरी मेळ्यांत भाग घेण्याच्या इराद्यानं येत होत्या अन् प्रार्थना आटोपून रात्र पडायच्या आंत घरोघर निघूनही जात होत्या. त्या प्रकरणानंतर स्त्रियांची एक सभा झाली. सभेत एका तरण्या पोरीनं भाषण केलं.

" चार भिंती आड राहून सुखाचे संसार करायच्या कल्पना आपण आता सोडल्या पाहिजेत. आपण सुखानं संसार करूं ही कल्पनाच दिवसेंदिवस खोटी ठरत चालली आहे. कारण गुंडगिरीला ऊत आलेल्या काळांत आपण जगतों आहो. शेजारणीची अब्रू भर-रस्त्यावर लुबाडली गेल्याच्या कथा ऐकून आपण स्तब्ध बसून आहोत.

संरक्षणासाठीं पुरुषांच्या तोंडाकडं पहाण्याची जुनाट संवय आपल्याला सोडतां येणार नाहीं ? आपल्या शीलाचं रक्षण आपणालाच करतां आलं पाहिजे ! " वगैरे वगैरे. आकाशी होती ती !

बाबूला तिचं भाषण फारच आवडलं होतं. अन् अखेर वर मान करून ज्या निर्भयपणानं सहकारिणींच्या घोळक्यातून शेवटचं राष्ट्र-गीत तिनं म्हटलं होतं तो भाव आणि आविर्भाव बाबूच्या डोळ्यापुढं पुन्ह पुन्हा आला होता. अन् खरंच आकाशी इतरांपेक्षां कांहीं निराळी आहे, असं त्याचं अंतर्मन त्याला सागूं लागलं होतं !

आकाशीच्या मनांत बाबूविषयीं अशाच विचारांचा जो संभव झाला, तो निवळ परिचयावरून, दैनिक संभाषणातून अथवा त्याच्या सुदृढ शरीराच्या नुसत्या आकर्षणावरून असता तर गोष्ट निराळी होती.

व्यायाम शाळेचा वार्षिकोत्सव जवळ आला होता. ह्या वार्षिकोत्सवाला फार महत्व होतं. परवाच झालेल्या दंग्याच्या जखमा अद्याप बऱ्या झाल्या नव्हत्या. त्यांच्या सरकारी चौकशीचं सोंग जनतेनं ओळखलं होतं. जुलमानं व जबरीनं होत असलेल्या जळफळाटांत हा एक आणखी भडका उडला होता. ज्यांनीं मार खाल्ला होता, त्यांची प्रतिकाराची जाणीव नुसती आग धरीत होती. अन् अशांतच ह्या उत्सव दिनाचे अध्यक्ष म्हणून 'स्वामीजी' खडाळ्याला येण्याचं जाहीर झालं होतं.

बाबूला या उत्सवाचं विशेष महत्व वाटलं नव्हतं. व्यायाम शाळांच्या संचालनावरची, त्यांच्या उद्देश अन् विधेयावरची परवाच्या दंग्यापासून त्याची श्रद्धाच उडाली होती. सर्कशीतले खेळ अन् ह्या

तालीमखान्यातलें लेझीम अन् लाठी बोथाटीचे हात यांत फरक काय होता ? चार भिंति आडची ही बलाची, अन् शिस्तीची पद्धतशीर उपासना बहुसंख्यांच्या जीवनाला कोणत्या दृष्टीनं हिताची होती ? परवाच्या दंग्यांत काय झालं होतं ? व्यायाम शाळेंतले लाठी दल धावून गेलं होतं अन् जखमी होऊन पडलं होतं. बस ! माणसं पळत होतीं. गुंड वार करीत होते. अन् ह्या लाठी दलाला पवित्रें टाकायला त्या गर्दीत धड जागा तरी होती का !

बाबूला ह्या उत्सवाबद्दल जें थोडं फार औत्सुक्य वाटूं लागलं त्याचं कारण म्हणजे स्वामीजी येणार म्हणून.

व्यायाम शाळेच्या मधल्या खोलीत एक बजरंगाची मोठी तसबीर होती. ' नमस्कारा ' चा तक्ता होता बलोपासना अन् तदनुषंगिक गोष्टी सांगणारे थोरांचे छापील बोल भिंतीवर अडकविले होते. योगासनांचीं ' चित्रं ' होतीं. व्यायाम मासिकांतील कुस्तीच्या पेचांना चौकटींत बसवून लटकाविलं होतं अन् ह्याच गराड्यांत शिवाजी, गांधी, लोकमान्य, विवेकानंद यांचीं वेगवेगळीं छायाचित्रं होतीं, त्यांत जवळच स्वामीजींनाहि स्थान होतं !

ह्या प्रांतांतले एक राजकारणी पुरुष म्हणून ते मानले जात होते. बाबू त्यांच्याबद्दल नुसतं ऐकून आणि वाचून होता. मोठी आदर्शनीय व्यक्ति असावी असं त्याचं मन त्याला सांगत होतं !

प्रचंड जयघोषांत खडाळ्याच्या स्टेशनवर स्वामीजींचं स्वागत झालं. बाबूनं डोळे भरून त्यांना पाहिलं मात्र ! भक्ती युक्त आनंदानं त्याचं मन नुसतं न्हावून निघालं अन् असे कांहीं अननुभूत भाव मनांत दाटले कीं, क्षणभर तो अगदीं मंत्रमुग्ध होऊन

गेला ! जणूं हिमालयाची अवघड चढउतर सायासानं ओलांडित निघालेल्या प्रवासाला कैलासाचं उतुंग हिमधवल शिखर दिसून आलं होतं ! जणूं तेजाच्या तपस्येत युगं घालण्याची लोकोत्तर इच्छा उद्भवलेल्या मनाला स्वर्गंगेचा झोत पहायला मिळाला होता ! त्याच्या तरण्या मानवी नेत्रांना आज कुठं विभूतीचं दर्शन घडलं होतं. सारा जयजयकार थांबला होता. तरी त्या भारलेल्या भरांत 'स्वामीजीकी जय' असे शद्ब त्याच्या तोंडा बाहेर पडले होते. अन् ते आपले एकट्याचेच शद्ब आहेत असं कळून आल्यावर तो ओशाळला होता !

स्वामीजीच्या व्यक्तित्वाचा बाबूच्या मनावर उमटलेला पहिला ठसा असा होता !

त्यांनीं व्यासपीठ भूषविलं. व्यायाम शाळेच्या कवायती कार्यक्रमाला आरंभ झाला. बाबू काय करित होता, याचं त्याचं त्यालाच भान नव्हतं. टाळ्या कडाडत होत्या अन् कौतुकाचे उद्गार वारंवार कानांवर पडत होते. अखेर स्वामीजींनीं त्याला जवळ बोलावलं होतं. अन् बाबूनं स्वामीजींना विनम्र भावनेनं प्रणाम केला होता ! नंतर त्यांच्या भाषणांतला प्रत्येक शद्ब श्रुतींची सारी शक्ती एकवटून बाबूनं टिपून घेतला होता.

"........आपण या भूमीवर अशा एका काल खंडातून जात आहोंत न् जगलों आहों कीं, जिथं अन्यायाचा प्रतिकार करण्याची एक नवीन तेजस्वी कल्पना नुकतीच उदीयमान झाली आहे. शस्त्रांचे खणखणाट आणि रक्ताचे ओघ या खेरीज आजवरच्या इतिहासाला अधिक कांहीं सांगतां आलं नाहीं. आजवर जनतेनं

मदांधांना धुळींत मिळविलं. तुरुंगाचीं कवाडं फोडलीं—शासनसंस्था उलथून टाकल्या. पण माणसाला माणूस सुधारतां आला नाहीं. त्याची संहारक वृत्ती निर्मूळ झाली नाहीं. या नव्या युगातल्या नव्या कल्पनेंत मात्र अंतर्बाह्य थारेपालट घडवून आणण्याचं सामर्थ्य खात्रीनं आहे. तिला शस्त्रांचीं स्वप्नं पडतात. पण तीं इतरांवर वार करण्यासाठीं नव्हे तर आपल्या छातीवर त्यांचे घाव झेलण्यासाठीं ! तिला रक्ताचा वास आहे पण बळी घ्यावयाची ती तयारी नसून आत्मयज्ञाची ती सिद्धता आहे. तुमच्या बलोपासनेचं मी कौतुक केलं आहे. पण शारिरिक सामर्थ्या बरोबर प्रयोगावस्थेतलं हे नवं तेजस्वी शस्त्र पेलण्यासाठीं तुम्ही तुमचं मानसिक सामर्थ्य आणि नैतिक धैर्य वाढविलं पाहिजे !''........

बाबूच्या विचाराला एक नवं क्षितिज मिळालं होतं ! एका हुतात्म्याचा स्मृतिदिन होता. व्याख्यानं झालीं होतीं. हरताळ पाळले गेले होते. तो उद्रेक व्यक्त करायचीं जेवढीं म्हणून साधनं होतीं, तीं सारीं उपयोगांत आणलीं गेलीं होतीं. खडाळ्यांतहि ह्या प्रतिध्वनींना अवकाश होता. विद्यार्थ्यांची एक छोटी सभा झाली होती, अन् अर्ध्याच्यावर शाळा ओस पडली होती. सारा शांततेचा कार्यक्रम होता. अन् तो अतिशय यशस्वी झाला होता.

ह्या यशावर जरीपटका मात्र दुसऱ्या दिवशीं चढला. मुलांच्या शाळेंत हडताळ पडणं, हा सीतारामरावांच्या कारकीर्दीवर केवढा कलंक होता ! सरकारी गोटांत कुजबुज झाली होती, अन् वरून खलिता यायला काय वेळ होता ? संतापानं सीतारामराव नुसते भडकून गेले होते. धमकी, दटावणं, यांच्या योगानं विद्यार्थ्यांच्या

म्होरक्यांचीं नांवं हुडकून काढण्याचे ते कसून प्रयत्न करीत होते. पण छट ! कुठं कांहीं पत्ता लागत नव्हता. मग सत्ताधारी आणि शस्त्रधारी जें करतात तेंच सीतारामरावांनीं करायला सुरुवात केली. हातांत छडी घेऊन वर्गावर्गांना जोडणाऱ्या व्हरांड्यांतून ते गर्जू लागले. मग हारीनं मुलं उभीं करण्यांत आलीं. एकवार काल गैरहजर राहिलेल्या मुलांच्या यादीवरून नजर फिरवून सीतारामरावांनीं करड्या आवाजांत फर्माविलं,

"काल घडलेल्या प्रकाराचा मी पुनरुच्चार करीत नाहीं. कालच्या कार्यक्रमांत भाग कोणी कोणी घेतला अन् कोणी कोणी घ्यायला लावला हें प्रामाणिकपणें सांगणारीं मुलं मला हवी आहेत ! आहे असा एकादा कुणी त्यांत ?

कुठं आवाज निघत नव्हता. कुठं हालचाल होत नव्हती. जणूं काय झाडून साऱ्यांना गोळ्या घालावयाच्या होत्या.

एक दोन मिनिटं विचारासाठीं दिल्यावर मग सीतारामरावांनीं कर्कश आवाजांत हांक मारली,

"बाबू !"

त्या नांवातले 'आ' कार आणि 'ऊ' कार ध्वनिमय होऊन इमारतीच्या छतातून कांहीं वेळ घोटाळत राहिले. निर्जीव चुन्याला न् विटांना देखील त्या स्वरांतली कठोरता सहन झाली नाहीं !

"सर !" निर्भय आवाजांत उत्तर आलं होतं.

"पुढं ये !"

विद्यार्थ्यांच्या समुदायांतील कांहीं माहितगार मुलांनीं पुढं काय होणार याची भयचकित अंतःकरणानं कल्पना केली होती.

इतक्यांत ‘ सप् ’ असा एक आवाज आला. बाबूच्या हातावर छडीचा प्रहार झाला होता, अन् लगेच प्रश्न विचारला गेला होता,

“ काल कोण कोण होतं, सांग ! ”

त्या कार्यांत त्याचा तसा कित्येक भावनाशील विद्यार्थ्यांचा संबंध होता. अन् तो प्रकट करून आपल्या सहकाऱ्यांचं आयुष्य कांही कालांसाठीं कां होईना त्याला मातीमोल करायचं नव्हतं.

जेवढ्या जोरांत प्रहार झाला होता, तितक्याच निश्चयाच्या स्वरांत उत्तर आलं होतं,

“ मला माहित नाहीं ! ”

एक हात संपला कीं दुसऱ्या हातावर तसेच आघात होत होते. नवव्या छडीचा प्रहार बसला तरी बाबू अबोल आणि अढळ पाहून सीतारामरावांना नवल वाटलं. पण त्यांचा गळा दाबण्याची अन् त्यांना अधर उचलून फेकून देण्याची एक जोरकस प्रवृत्ति त्याच्या मनांत उद्भवली होती. पण त्याला कुठल्या अंतराळांतून कुणाला माहित स्वामीजींचे शद्ब ऐकूं येत होते,

“ पाशवी शक्तीच्या प्रतिकाराच्या नव्या कल्पनेला शस्त्रांचीं स्वप्नं पडतात, पण तीं इतरावर उगारण्यासाठीं नव्हेत, तर त्यांचे आघात स्वतांच्या छातीवर झेलण्यासाठीं ! ”........

अन् मग त्यानं दुसरा हात पुढं केला होता !

हाताच्या तळव्यांत अद्याप जीव असावा. आणखी एक आघात झाला तेव्हां मनाचा कुठलाला एक नाजुक ठिसूळ भाग विरघळला कीं काय कोण जाणे ! कारण डोळ्यांच्या कडांनीं एक अश्रू

हलकेच प्रकट झाला होता. तो घात करील अशी शंका घ्यायचं मुळींच कारण नव्हतं. कारण आवाजांतला ताठरपणा जरा देखील न ढळूं देतां त्यानं त्यांच्या प्रश्नाला पुन्हा उत्तर दिलं होतं,

" मला माहित नाहीं ! "

त्याचे सुजलेले तळवे पाहण्यासाठीं आकाशीनं त्याचीं मनगटं हलकेच हातांत धरलीं होतीं, अन् 'बाबू' असा एक भितरा अन् कापरा उद्गार काढून ती क्षणभर स्तब्ध झाली होती. त्या सकंप शद्बांना खोल सहानुभावाची धार होती. अन् त्याच्या पराक्रमाचा तीव्र प्रत्यय येऊन ती मुग्ध झाली होती !

जखमा बऱ्या झाल्या अन् वेदना निघाल्या तरी त्या संबंधीचे उलटसुलट विचार मात्र बाबूच्या मनांत सारखे फिरकत होते. अन् आतां एक नवीन प्रयोग करून पाहाण्याची तो सिद्धता करित होता.

एकादी लहानशी जखम झाली कीं तीवर मीठ टाकून अथवा लिंबू पिळून आपण किती वेळ कळा सहन करूं शकतो हें तो अजमावून पहात होता. कंदिलाचे तापलेले काच हातात धरून ठेवायचा तो सराव वाढवित होता आकाशीनं सभय आणि सकुतुहल विचारलं तेव्हां त्यानं उत्तर दिलं होतं,

" माझ्या दुर्बलते विरुद्ध मोहिम आहे ही. परवां शाळेंत ती शिक्षा भोगताना कुणाला दिसला नाहीं तरी मलाच कळून येईल असा एक अश्रू डोळ्यांत आला होता ! तो केवळ माझी सहन-शक्ती संपत आली म्हणून आला असावा. प्रत्यक्षाच्या वेदना मनाला जाणवूं लागल्या कीं, दुर्बलता आपला प्रभाव गाजवूं लागते. त्यापेक्षां

वेदनांच्या स्थळांनाच अधिक प्रहारक्षम केलं तर नाहीं कां जमणार हें पहातों आहे. खरंच 'आकाशी' ही कल्पना मोठी चांगली आहे नाहीं ! हातांची संवेदन शीलताच नाहींशी झाली तर छब्याचं काय, खवखवले कोळसे जरी हातावर ठेवले तरी मनाला त्याची कांहींच कल्पना होणार नाहीं! जाईचीं अन् मोगरीचीं फुलंच हातावर घेऊन आपण मिरवतो आहों असं वाटलं पाहिजे. आपल्या न् राष्ट्राच्या उद्याच्या जीवनांत कसकसल्या आपत्तींना तोंड द्यावं लागणार हें कुणी सांगावं ! आपण आपल्या तयारीनंच असलेलं बरं नाहीं का ! प्रहार झेलतां झेलतां शस्त्रांचीं शकलं झालीं पाहिजेत. मनाला न् शरीराला त्याची कदर न वाटली पाहिजे ! "

बाबूच्या डोळ्यांत त्यावेळीं अशी कांहीं विलक्षण दीप्ति झळाळली होती कीं, हेतूशून्य जळून काजळलेल्या कुड्यांनीं येथून प्रकाशाचे स्रोत वाहून न्यावे ! आकाशी क्षणभर दिपून गेली होती अन् बाबू सामान्यापेक्षां निराळा आहे, याची तिला चांगली जाणीव झाली होती.

बाबूचं हे निराळेपण आणखी एकानं जाणलं होतं.

मौलवी अजीजुद्दिन 'रफीक' म्हणजे बाबूराव दडक्यांचे जिवलग स्नेही. अजीज बाबूचा सहाध्यायी. त्याचं गणित फार कच्चं होतं. साधं, सिंप्लिफिकेशनचं उदाहरण देखील त्याला धड सोडवितां आलं नाहीं. 'अधिक' 'उणे' 'चे' आणि 'भागिले'च्या खुणा त्याला एकाद्या काफरासारख्या वाटत होत्या. अन् तशांत ते लहान मोठे वेगवेगळे कौंस ! हे कौंस ठार करणं अन् तीं चिन्हं व्यवस्थित उलगडणं जिवावर उदार होऊनहि त्याला जमत नव्हतं. बाबूचं

गणित चांगलं म्हणून हें समजाऊन घ्यायच्या निमित्तानं अजीज बाबूकडं येऊं जाऊं लागला. संघटन वाढलं. स्वभावाचा, आवडी निवडीचा परिचय होऊं लागला. सहज कुठं भेट झाली तर 'अदाब-अर्ज' हातांत हात मिळले जाऊं लागले. 'खैरियतची' औपचारिक विचारपूस होऊं लागली. अन् 'अच्छा चलेंगे' म्हणून शेवटचा तात्पुरता निरोप घेऊन ते आपले मार्ग आक्रमूं लागले.

अजीज कवि होता. 'रफीक' हें त्याचं टोपण नांव होतं. शाळेतल्या उर्दू त्रैमासिकांत अन् बाहेरच्या नियत कालिकातून त्याच्या कविता येत होत्या. त्या "अजीजुद्दीन रफीक" या नांवा-खालींच उरुसांत अगर इतर उत्सवप्रसंगीं जे 'मुशायरे [ ( कवि-सम्मेलनं ) होत होते त्यांत जाणत्या रसिकाकडून वारंवार 'दाद' मिळविणारा तरुण मुस्लिम कवि म्हणून त्याची चांगली ख्याति होती. खडाळ्यांत मुस्लिम हितसंवर्धक ज्या संस्था होत्या त्या प्रत्येकातून अजीज वावरत होता. खाकसारांच्या रपटींत भाग घेत होता. संस्कारानं, शिक्षणानं अन् वातावरणानं मोठी तीव्रतर मुस्लिम भावना त्याच्या मनांत होती. हिंदू द्वेशाचीं तिला फळं लागावीं ह्यांत नवल नव्हतं.

"इदारे अदबियांत" म्हणून एक मुस्लिम वाङ्मयीन वर्तुळ खडाळ्यांत स्थापन झालं होतं. अन् एक प्रमुख म्हणून 'रफीक त्यातून मिरवत होता.

कशी कुठून कल्पना निघाली कोण जाणे ! त्या इदाऱ्यांत एकदां हिंदु मुस्लिम पुढाऱ्यांना छापील आणि लेखी निमंत्रणं दिलीं गेलीं. हिंदु मुस्लिम ऐक्यावर मोठी कळकळीचीं भाषणं झालीं. उर्दू

आणि मराठी कविता वाचून गावून दाखविण्यांत आल्या. ऐक्य संवर्धनाचा असा कांहीं बताव केला गेला कीं, सभा संपल्यावर प्रत्येकाला वाटलं, संपलं आपल्या राष्ट्राचं नष्टचर्य आतां !

इतर तरुणांप्रमाणं 'रफीक' नही भाषणांत भाग घेतला होता. प्रौढ उर्दूतून त्याच्या बोलण्याचा आवेश, रामायण महाभारतातील उदाहरणांचा त्यानं मुक्तकंठानं केलेला उल्लेख, अन् आत्यंतिक भावनावश होऊन ऐक्याची सर्वांना त्यानं घ्यायला लावलेली शपथ ह्या साऱ्या गोष्टी पाहून बाबूला त्याच्याबद्दल आदर आणि आपले-पणा वाटूं लागला होता.

पण फार दिवस झाले नाहींत. इदाऱ्यांत घेतलेल्या शपथा इदाऱ्यांतच राहिल्या. अन् हिंदूच्या एका मिरवणुकीवर अकस्मिक भयकारक आणि निर्घृण हल्ला झाला. दगडफेंक होत होती. लाठ्या पडत होत्या. गोंधळ गलबलाट आणि भाऊगर्दी माजली होती. कांहीं कोरे करकरीत पोशाख धुळीनं भरले होते. कांहीं रक्तानं माखले होते. बाबूला मार लागला होता. अन् काठ्या मारणाऱ्यापैकीं जवळच्या एकाकडं पाहून त्यानं म्हटलं होतं,

"कोण अजीज ?"

अजीजचे हात एकदम ढिले पडले होते ! मग अर्थात् यायचे त्यावेळीं अन् यायचे त्या तऱ्हेनं पोलिस आले होते. अन् धरपकडीचे देखावे करून जमाव उधळून लावण्यांत आला होता.

ह्या पकडल्या गेलेल्या माणसांत मौलवी अजीजुद्दिन 'रफीक' होतेच.

दुसऱ्या दिवशीं जखमी माणसांच्या जबान्या घेण्यांत आल्या.

पकडली गेलेली मंडळी दंग्यांत होती कीं काय याची त्यांच्या कडून फेरतपासणी होऊं लागली. बाबूची जबानी झाली. एकेक माणूस त्याला दाखविण्यांत आला अन् अजीजलाहि त्याच्यापुढं उभं करण्यांत आलं !

ऐक्याची घेतलेली शपथ तो विसरला होता. पण बाबूला एवढ्यांत तिचा विसर पडेल हें शक्य नव्हतं. अजीजला एकवार बाबूनं आपादमस्तक निरखून पाहिलं, अन् थोडसं स्मित केलं. तो सौम्य तिरस्कार अजीजला कमालीचा मर्मान्तक वाटला. त्यानं आपली नजर खाली वळविली. त्या अनुताप दग्धानं बाबूचे मग शब्द ऐकले,

"नाहीं; हे नव्हते दंग्यांत !"

अजीज क्षणभर थक्क झाला होता. अन् मग पोलिसी अलंकारातून मोकळा झालेला हात त्यानं अभिवादनासाठीं वर केला होता !

त्या तीनखणी भाड्याच्या खोलींत अलीकडं रफीकची हांक ऐकूं येत नव्हती. त्यानं भेट टाळावी हें बाबूला चांगलं वाटत नव्हतं. आपणहून एकदा तो अजीजच्या घरीं गेला अन् घरांत गोषा असेल या कल्पनेनं अलीकडूनच हांक मारली.

अजीजनं खिडकी उघडून पाहिलं तों बाबू ! निशब्दता फार वळ टिकविण्यांत कांहीं अर्थ नव्हता. बाबूनं एकदम पुढं होऊन म्हटलं,

"भल्या माणसा परीक्षा जवळ येत चालल्याची कांहीं शुद्ध आहे कीं नाहीं ? परिस्तानच्या सरहद्दीवरून चकरा घालणाऱ्या तुझ्या मेंदूला जरा जगांत आण अन् गणितं सोडावयाचीं आहेत असं त्याला सांग ! खाना झाला असेल तर चल लौकर !"

शरमेचा अन् अनुतापाचा चमत्कारिक अबोला अखेर असा संपला होता. हळूहळूं अपेक्षित अन् अपेक्षेबाहेर स्थित्यंतरं होऊं लागलीं होतीं.

अजीजचं हें दिन (सुनी) पंथीं घराणं दक्षिणी समजलं जाईल इतकं पुराणं होतं. घरांत वीणकऱ्याच्या धंद्याच्या आठवणी अजून कायम होत्या. ऐश्वर्य नसलं तरी घराण्याला विद्वत्तेचा संपर्क होता. अजीजचे वडील फारशीचे अधिकारी होते. 'गुलिस्तान' आणि 'बोस्तान'चं रहस्य समजावून सांगणारा त्यांच्या काळांत लवाळ्यांत दुसरा कुणी माणूस नव्हता. विद्यार्थ्यांस अन् विद्वानांत 'हजरत' अशी एक आदरयुक्त संज्ञा त्यांना होती. कवित्वाचं कोवळं लेणं अजीजला त्यांच्यापासूनच लाभलं होतं. पण त्यांच्या जगण्याचा काळ आणि अजीजच्या संविधानाचा काळ, यांत फार अंतर होतं. त्यांचा शांततेचा, सौख्याचा अन् समाधानाचा काळ होता. आतांचा अशांततेचा, द्वेशाचा, अन् दंग्याधोप्यांना चालना देणारा काळ होता! घरांत मांसाहार वर्ज्य नव्हता पण आतांच्याइतकं अधिक नव्हतं.

दाबूनं म्हटलं होतं,

"अजीज, तुम्हा लोकांना सुधारायची माझी एक पोरकट समजूत आहे. तुम्हा मंडळीना नुसत्या शाकाहारावर ठेवलं तर तुमची हिंसात्मक प्रवृत्ती कमी झाल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं! तुम्हाला सकाळीं स्नान घालून बाहेर काढलं कीं, तुमच्या मनावरचा धुरळाहि धुवून निघेल. मांसाच्या विचित्र वासानें भरून गेलेलीं तुमचीं स्वयंपाकघरं स्वच्छ केलीं, तर तेथल्या मनांतून चांगल्या विचारांची धारणा व्हायला कांहीं वेळ लागणार नाहीं!"

" माझं शुद्धिकरण करण्याच विचार दिसतोय तुझा ! " असं म्हणून अजीज मोठ्यानं हसला होता.

परंतु दर जुम्म्यालाच पाण्यांत बुचकळणारा अजीज आतां रोज सकाळींच स्नान करित होता. कसाईखान्याकडं वळणारी त्याची बुद्धी आतां भाजी मंडीत हिंडू लागली होती.

आणखी एक आकर्षक बदल अजीजमध्यें दिसूं लागला होता.

त्याच्या नवख्या न् नवेपणाच्या नव्हाळीनं झळकूं लागलेल्या काव्य देवतेला इस्लामाच्या पूर्ववैभवाचीं स्वप्नं पडत होतीं. दिल्लीच्या आठवणींचा उमाळा येत होता. तरवारींच्या न् भाल्यांच्या धारावर जे रक्त दिसत होतं ते धर्मवेड्या भावनेचं उथळ स्वप्न होतं. परिस्तानच्या उद्यानातून बुल्बुलाचे आर्तरव येत होते. विलासाची कल्पना इतकी शृंगारप्रधान होती कीं, जिन्यावरून उतरताना प्रत्येक पायरीगणिक यौवनानं रसरसत अन् लसलसत असलेल्या अनावृत्त इराणी कुचकुंभांचा आधार घेत उतरणाऱ्या एखाद्या विलासी ' खलीफा 'ला रफीकच्या काव्यांत अवतार घेण्याची इच्छा व्हावी ! द्राक्षाच्या मळ्यांतून वाहून येणारं संध्याकाळचं सुरत वारं, ' साकी 'च्या हातांतलं मद्य आणि त्या मदालस नेत्रांतली मोहिनी, ' शमापरवाना ' ( दीप पतंग ) ची बेचैन करणारीं रुपकं इत्यादि गोष्टी रफीकच्या काव्यांतून अस्तंगत होत होत्या.

रफीक आतां रफीक ( मित्र ) च्या भूमिकेवरून कविता लिहूं लागला होता. ' सारे जहांसे अच्छा हिंदूस्तां हमारा ' म्हणून गाणाऱ्या राष्ट्रीय वृत्तीचा बेफाम जोस त्यांतून उसळत होता. मौलवी 'रफीक' अलीकडं गावूं लागले होते, नव्या भारताचे सुपुत्र शोभतील

असे दोन तरुण हातात हात घालून चालले होते. आजवर कुणा-लाच जातां आलं नाहीं असा त्यांचा मार्ग! ग्रहगोलांनीं एकदम आपली चाल मंद केली. तेजाचे डोळे उघडून ते समोर पाहूं लागले. अन् आपलं तेज त्यांच्या मार्गावर पसरूं लागले. वृक्षतलांची सळसळ त्यांच्या पाऊलांची चाहूल अंतराळांतून उठवित होती. त्यांच्या चालीच्या गतीवर पाखरांनीं गायला आरंभ केला होता,..........
त्यांना मजिदीतली 'अजां' ऐकूं येत नव्हती किंवा देवळातला घंटानाद त्यांच्या कानावर पडत नव्हता. धर्माधर्मांच्या खोट्या कल्प-नांनीं त्यांचीं मनं भ्रष्ट होत नव्हतीं. आजवर लागलेले रक्ताचे डाग विचार गंगेच्या प्रवाहांत न्हावून त्यांनीं धुवून टाकले होते.

खडाळ्याच्या आसपास अन् खडाळयांत फिरकणाऱ्या वर्तमान पत्रांचा आवाज चढूं लागला होता. सामुदायिक स्वरूपाचं कांहीं घडून येणार असल्याचीं चिन्हं वातावरणांत दिसूं लागलीं होतीं. स्वामीचा खडाळ्याला दौरा झाला. त्यांच्या व्याख्यानाला परवानगी मिळणं शक्य नव्हतं. कारण त्यांच्यासाठीं अन् त्यांच्यासारख्यासाठीं कायदे वरचेवर कडक होत चालले होते. वक्तव्याची स्वामीजीनाहि लहर नसावी. कुठंतरी कसलशी गुप्त सभा झाली. ह्या बऱ्या गोटांत काय शिजलं कांहीं कळलं नाहीं. पण ते कळवून घेणं कांहीं कठिण नव्हतं!

बाबूला समोरून जातांना अजीजनं पाहिलं न् हांक मारली.

"अरे 'बली' कुठं होतास सकाळपासून? खोलीवर किती चकरा केल्या. कांहीं तुला—? चुकलेला फकीर मशिदींत—माफ कर. बँकरच्या घरांत असेल म्हणून तिथं पाहिलं!...." बँकरच्या घरच्या

उलेखावर मनसोक्त हंसून घेतल्यावर तो म्हणाला, " आधीं ह्या शिंप्याच्या दुकानांत चल ! "

" कां ? कशाला "

" कळेलच मग ! "

ही जोडगोळी एका शिंप्याच्या दुकानांत आली. अजीजनं बाबूला फर्माविलं,

" हं उभा रहा माप द्यायला. आज कित्येक दिवस एका कोटावर काढीत आला आहेस तें पुरें झालं....! "

" खरंच किती सुंदर कापड आहे हे ! हातवीण इतकी सहसा चांगली आढळत नाहीं. एकाद्या चांगल्या ठिकाणीं हें नेऊन विकलं तर किती पैसे येतील ! आज एकेक पैसा मला फार मोलाचा वाटूं लागला आहे ! "

" बाबू चांगल्या वस्तूकडं पाहण्याची तुझी दृष्टी बदलत चालली आहे. उद्यां बँकेतलं एकादं कोरं पास बुक सुंदर म्हणून तूं खुशास विकून टाकशील ! भल्या माणसा ! खास 'मा' नं आपल्या हातानं विणलेलं कापड आहे हे अन् ते तुझ्यासाठीं मुद्दाम तिनं पाठवून दिलं आहे ! "

" मा इथं नाहींत ? "

" नाहीं मामाकडे गेली आहे ! तुला पैशाची एवढी कसली अडचण आहे ? भाडं थकलंय् कीं काय ? कोण आहे तुझा तो खोलीचा मालक दाखीव तरी एकदा असा........

" हं, जातीवर येऊं लागलास ! "

" अच्छा जाने दो ! पण अडचणीबद्दल नाहीं सांगितलंस तूं ! "

" सांगतो खोलीवर गेल्यावर ! "

नंतर शिंप्यानं त्याचं माप घेतलं होतं, अन् खुणा करायचा कापडाचा भाग कानापासल्या घामावर घासला होता. पेन्सिलीच्या अभावावरला तो रामबाण उपाय होता !

बाई जवळपास नाहींत असं पाहून बाबूनं आकाशीला हांक मारली न् म्हटलं,

" गुप्त दानाचं पुण्य किती असतं ह्या विषयीं तूं केव्हां कुठं वाचलं आहेस ? "

" वाचलं नाहीं पण ऐकलं आहे मात्र ! "

" होय ना ! मग स्वतःजवळ असतील नसतील तेवढे पैसे घेऊन ये ! "

" म्हणजे ? "

" म्हणजे वगैरे कांहीं नाहीं. अधिक खोलांत शिरून पुण्याला पारखी होऊं नकोस ! "

" फार अडचणीत आहेस ? आईना सांगून देवविते मी !"....

" छट् ! मुलांचे मामले मोठ्यांत नकोत. अन् तुला माहित आहे मला कांहीं अडचण असती तर मी उघड केली असती ? "

" अरे पण सांग ना कशाला हवेत ते ? "

" छे ! हें सारं गुप्त आहे ! अन् हेच तर गुप्तदानाचं रहस्य आहे ! "

मग आकाशीनं आपली सारी पुंजी त्याच्या हवाली केली होती. रुपये, नाणं, आणि खुर्दा मिळून पांच सहा रुपयावर ती रकम सरकली नव्हती. घरी आल्यावर बाबू ह्या गुप्त देणगीची अन्

देणगीदारांची यादी करित होता. ' आकाशी ' हें नांव काढण्या-पूर्वी कांहीं तरी चार पांच मिनिटें त्याला लागलीं होतीं. 'आकाशी' ह्या वर्णात देखील मृदुतेची अन् माधुर्याची केवढी झाक होती. पण त्या नांवाच्या नांवाला जाण्याचा त्याला काय अधिकार होता ? पुढचीं नांवं मग त्यानं भरभर लिहून काढलीं होतीं. सारे बेचाळीस रुपये जमले होते. पोस्टातलं पासबुक साफ करून टाकलं तरी पन्नासाची भरती होत नव्हती. पण त्याला कांहीं इलाज नव्हता. रुपये ठेवलेल्या हातरुमालाचीं चारहि टोकं त्यानं बांधलीं अन् खांद्यावर टाकलेल्या धोतराच्या सोग्याआड ती रकम झाकून तो पोस्टाकडं निघाला. पोस्टांत पांच सहा रुपयापेक्षां त्याचं अधिक धन नव्हतं. परिक्षेची फी भरण्यासाठीं शिकवणींतून उरतील तसे पैसे त्यानं अशा तऱ्हेनं संचय करून ठेवले होते. पण परिक्षेकडे अथवा फीकडं पाहण्याची ही वेळ नव्हती. पोस्टाच्या फाटकांत एक मास्तर त्याला भेटले होते नमस्कार करण्यासाठीं त्यानं हात वर केला तेव्हां धोतराचा सोगा खाली पडला होता. हातातली रुपयांची गाठोडी पाहून मास्तरांनीं पृच्छा केली होती,

" अँ ! कसले रे हे पैसे ? "

" कांहीं नाहीं आपलं सहज ! "

असं भानावर नसलेल्या माणसानं द्यावं तसं त्यानं उत्तर दिलं होतं. पोस्टातलं काम आटोपल्यावर तो परतला होता. एकादं सत्कार्य करण्याचं योजलं अन् अपेक्षेप्रमाणं तें सफळ झाल्यावर होणाऱ्या आनंदाला कांहीं सीमा नसतात. त्या दुथडी आनंदाच्या तरंगावर बाबू पोहू लागला होता. सायकलच्या घंटीचा जवळ खणखणाट

झाला होता. तो त्याला ऐकूं आला नव्हता. तो सरकत नाहीं असं पाहून सायकलवाल्यानंच जरा बाजूनं सायकल हाकारली होती.

बेबीनं जोर जोरानं हांका मारल्या तेव्हां मात्र त्याची ही निशा खाडकन् उतरली होती. कारटीचं आतांच कसलं काम निघालं होतं कोण जाणे ?

" बेबी, मी जरा कामांत आहे आज ! "

" होयरे ! मला माहित आहे तुला नेहमी कामं असतात तीं ! पण पांच सहा मिनिटांसाठीं येऊन जा ना ! "

" जरा वेळानं आलों तर नाहीं कां चालणार ? " " अहं ! मी तुला जास्त वेळ थांबविणार नाहीं ! " हें विघ्न टळत नाहीं असं वाटल्यावर तो आंत गेला. त्याच्या हातातल्या रकमेची चौकशी करण्याइतकी ती सावध नसावी. तिचे डोळे थोडेसे लाल झाले होते. गाई नुकत्याच पाण्यावर येऊन गेल्याचीं चिन्हं दिसत होतीं. " हं सांग लौकर काय काम आहे तुझं ? " " आमच्या 'बाई'नी ( मास्तरीण ) जवळच्या माणसाला एकपत्र लिहून आणायला सांगितलंय्. मघापासून बसले आहे पण कांहीं जमत नाहीं !.......

" जवळच्या म्हणजे कुणाला ? "

" अगदीं अगदीं जवळच्या . "

'दी'चा उच्चार करतांना तिच्या नाकाला गमतीच्या घड्या पडल्या होत्या अन् नेत्रांच्या अन् ओठांच्या हालचालीतून मोठा लाडिक भाव व्यक्त झाला होता. त्या 'अगदी जवळच्या माणसा' चा अर्थ दुर्बोध नव्हता. कवि रानगुलाब ! त्या गुलाबाचं अन् ह्या कळीचं कांहीं खटकलं तर नव्हतं ? बेबीच्या डोळ्यातली लाली काय सांगत होती ?

लाली संबंधीं केलेली कल्पना खरी आहे किंवा नाहीं हें मावून पाहण्यासाठीं बाबूनं तिला विचारलं,

" बाईनीं एकादं प्रेमपत्र लिहून आणायला सांगितलय् काय ? "

" अं ऽ तसंच कांहींसं ? "

आतां अधिक खोलांत शिरण्यात कांहीं अर्थ नव्हता. त्यानं कागद ओढून घेतला न् विचारलं,

" कुणाच्या नांवानं लिहू ! "

" कुणाच्याहि नांवानं लिहीं ! घाल माझंच नांव नाहीं तर ! "

मग त्यानं लिहायला आरंभ केला होता,

" प्रिय बेबी !

मला तुझ्या नेहमी आठवणी येतात ! तुला मात्र माझा विसर ग असावा ! प्रेमांतल्या माणसानं आपल्याला विसरून जाव क्षां दुसरी दुःखदायक गोष्ट कोणती ? एकमेकावर मनःपूर्वक करण्याच्या अन् ते जन्मभर टिकविण्याच्या आपण शपथा ़्या. आठवतो कां तो दिवस ? माझ्या डोळ्यापुढं तें सारं दृश्य र्दी जशाच्या तसं आहे. माझ्या लाडक्या प्रेमा ! पुरे झाली ही ता ! हें मनोमोहन मी आतां कुठवर सहन करूं ?........ ोण्याच्या भरांत खाली त्यानं आपली सही देखील केली होती तें लक्षांत आल्यावर ती खोडून टाकली होती. बेबीनं मायना ाईनं वाचला, अन् 'छान' असा उद्गार काढून त्याला जाण्याची ानगी दिली. बेबीच्या अन् रान गुलाबाच्या मलिनाचं मोठं गोड त्याच्यापुढं आलं होतं. शुभलग्नाचा 'नांदासौख्यभरे' चा

आशिर्वादहि मनांतल्यामनांत त्यानं उच्चारला होता. हें आणखी एक सत्कृत्य आपण उरकलं आहे असं त्या क्षणांत त्याला वाटलं होतं.

नंतर त्यानं स्वामीजीच्या खोलींत प्रवेश मिळविला. त्यांना अभिवादन केलं. दस्तींतले रुपये त्यांच्या पुढं ठेवले. कृतकृत्यतेचं अपूर्व समाधान त्याच्या चेहऱ्यावर झळकलं.

स्वामीजींनीं त्याला त्याचें नांव विचारलं होतं; मोठ्या विनयशील आवाजांत अन् वाणीसंस्कार अति सतेज आणि शुद्ध ठेवित त्यानं उत्तर दिलं होतं,

" बाबू दडके ! "

काय नवल तरी. त्याला व्यायाम शाळेत पाहिलं असल्याची अचूक आठवण देखील स्वामिजींनी काढली होती. खरंच एवढ्या अलौकिक पुरुषानं त्याचं नांव लक्षांत ठेवावं, असं त्यांत काय होतं ? पण सिद्धांचा लोकोत्तरपणा त्यांतच होता कीं, ते जें पाहातील, ज्या अकिंचन नांवाचा उच्चार करतील त्या वस्तूंचा अन् त्या नांवाचा उद्धार झालाच म्हणून समजावा ! मोठ्या कष्टानं मिळविलेल्या त्या धनाच्या मोबदल्यांत बाबूही आत्मिक शांति घेऊन परतला होता. आणि नंतर स्टेट कांग्रेसच्या स्थापनेला सरकारनं बंदी केली होती. लढा सुरू झाला होता. सत्याग्रहासाठीं जीं निरनिराळीं केंद्रं कायम करण्यांत आलीं होतीं, त्यांत अर्थात् खडाळंहि होतं. ह्या संक्रमणाच्या कालांतली एक विचारसरणी अशी होती कीं, थोडासा पैसा मिळाला, सुराळित जगतां आलं, आपल्या डोळ्यांदेखत मुलांचं शिक्षण, नौकरी आणि लग्न झालें कीं, खलास ! कसलं राष्ट्रकार्य अन् कसलं काय ? दुसरा एक वर्ग असा होता कीं, त्यांना

अन्याय होतो आहे हें कळत होतं. राष्ट्र, संस्कृति इत्यादि शब्द त्यांना परिचित होते. पण जुलमाला न् जबरीला वाचा फोडण्याची, प्रतिकार करण्याची धमक त्यांच्यांत नव्हती. तिसरी विचारसरणी धडाडीची कार्यक्षम अन् अन्याय प्रवृत्तांना प्रतिकार करण्यासाठीं प्राण पणाला लावणारी होती. अशाच विचारांच्या कित्येक वकिलांनी आपल्या भरमाप मिळकतीवर पाणी सोडलं. कित्येक धनिकांच्या मुलांनीं इस्टेटीची काळजी टाकली. तिसऱ्या वर्गातल्या कित्येक सरकारी नौकरांनीं नौकरीवर लाथ मारली. अन् कित्येक विद्यार्थ्यांनीं भवितव्याची काळजी टाकून थोडसं समंजसपणानं अन् थोडसं भावनेच्या भरांत उत्साहानं ह्या चळवळींत भाग घेतला!

परिक्षा जवळ आली होती पण बाबूनं केव्हांच शाळेवर बहिष्कार टाकला होता. कॉंग्रेसचीं पत्रकं वाटणं, पोलिसांचा डोळा चुकवून तीं भिंतींवर लटकाविणं, परगांवाहून सत्याग्रह करण्या-साठीं येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टेशनवरून शिताफीनं गांवांत आणणं, पोलिसांना पत्ता न लागेल अशा ठिकाणीं त्यांना ठेवणं अन् वेळेवर त्यांना बाहेर काढणं, असे बाबूचे निरनिराळे कार्यक्रम चालू होते.

रस्त्यावरून अपेक्षित गोंगाट येतो आहेसं ऐकून बाबूनं खिडकी-तून कुतूहलानं पाहिलं. आकाशी देखील धांवत आली. कुठल्याश्या विद्यार्थ्यांनीं नुकताच सत्याग्रह केला होता. पोलिस त्यांना ठाण्यावर घेऊन जात होते. दोन कोवळीं पोरं होतीं. खादीचा पोशाख, गळ्यांत पुष्पमाला, सत्तेचा निषेध आणि राष्ट्रीय विभूतींचा जयघोष, अशा थाटांतली ती लहानशी मिरवणूक पहाणारांच्या अंगावर रोमांच उभे करीत होती! मिरवणूक डोळ्यापुढून सरकल्यावर आकाशीनं विचारलं,

" कुठलींरे ही मुलं बाबू ?"

" रहिमतपुरच्या बाबासाहेब देशमुखांचीं !"

थोडीशी शांतता होती.

माणसानं एकदम एकाद्या विचाराच्या उसळीसरशी बोलावं तसं तो आकाशीकडं पाहून म्हणाला,

" येता शुक्रवार मला न् अजीजला दिला गेला आहे !"

" आजकाल अजीज दिसत नाहीं कुठं ?"

" आजारी आईला भेटण्यासाठीं म्हणून गांवीं गेला आहे येईल उद्यापरवां. खरंच मुस्लिम समाजांतला एक विचारी युवक सत्याग्रहांत भाग घेतो आहे ही किती चांगली घटना आहे ! सरकार स्टेट कॉंग्रेसवर जातीयतेचा आरोप करतं आहे, तो किती निराधार आहे हें अजीजच्या उदाहरणांत सिद्ध करतां येईल !"

" सत्याग्रहींना आतां त्रास होऊं लागलाय म्हणे ! मारहाण होत असल्याचं परवाच ऐकलंना आपण !"

" ह्या अशा अवस्थेतदेखील काय थोडा त्रास सहन करतों आपण ? यावेळीं भयानं मागं राहूं लागलों तर राष्ट्राचा फार मोठा घात केल्यासारखा होईल. धनाच्या राशी जिथं धूळ खात पडल्या आहेत, अशा घरांतलीं अन् घराण्यातलीं मुलं केवढ्या उत्साहानं आघाडीवर गेली आहेत. मी जन्माचा अनाथ. मजजवळ असं काय असणार ? अन् माझं म्हणायला या जगांत आहे कोण ?"

" मी आहेना !........"

मी आहेना !....ते अशा एका तरण्या पोरीचे शब्द होते कीं जिच्याविषयीं कांहीं एक नाजुक भाव बाबूच्या मनांत कित्येक

दिवसांपासून जागृत झाला होता. इतका आपलेपणा दर्शविणारे शब्द जन्मांत पहिल्यांदाच त्यानं ऐकले होते. केवढा जिव्हाळा अन् किती विश्वस्तपणाची भावना त्या शब्दांत होती !

" आकाशी ! "

बाबूचा आवाज कातर झाला.

" मी तुरुंगांत गेल्यावर माझी आठवण राहील तुला ? "

" असं काय म्हणतोस ? "

" तूं माझी आठवण ठेवावी इतकं महत्व माझ्या जीवनाला नाहीं ! "

" नाहींरे ! स्वतःविषयीं कांहीं तरी वेगळ्याच समजुती झाल्या आहेत तुझ्या, मी विसरेन असं तुला वाटतं तरी कसं ? "

अन् मग ती त्याला अधिकच बिलगली होती. शब्द संपले होते. अन् शब्दांनीं बाबूचं समाधान होत नाहीं असं वाटूनच कीं काय आपलं यौवनरंजित ऊर तिनं त्याच्या छातीवर टेकविलं होतं. आपल्या नाजूक हातांची त्याच्या गळ्यांत स्वर्णमाला केली होती. अन् मोठ्या खोल आणि गोड अपेक्षेनं आपले भावसंकुल डोळे त्याच्या मुखावर वळविले होते !

एवढ्या नाजूक आव्हाहनानं देखील बाबूच्या मनावरचं संकोचाचं पटल दूर झालं नव्हतं !....शनिवार, रविवार, खलास झाले होते. शुक्रवार आतां कांहीं फार दूर नव्हता. शुक्रवार ! किती शुभ दिवस निवडला होता त्यानें. " Your Fortune " म्हणून पुढं कांहींतरी अशुद्ध इंग्रजी बोलणाऱ्या एका पंजाबी ज्योतिषानं त्याचा Lucky day त्याला शुक्रवार सांगितला होता. लक्ष्मीची

उपासना व्हायची ती शुक्रवारींच. ‘आकाशी’ सारख्या भाग्य-देवतेनं आपलं रूप प्रगट केलं होतं तें देखील त्याच शुक्रवारावर! अन् आतां स्वातंत्र्य लक्ष्मीच्या उपासनेचा तो पहिला मुहूर्त करणार होता तो देखील ह्याच दिवशीं!

स्वामीजी तर रात्रीं अगदीं उशाला बसत होते. तो त्यांच्याकडं पाहून म्हणत होता,

“स्वामीजी! माझ्या आई बापाचा पत्ता नसल्यामुळं माझा धर्म, माझं समाजातलं स्थान, कळायला कांहीं मार्ग नाहीं! भारतीय संस्कृतीच्या–तिच्यातल्या व्यापक अर्थानं–मी एक अर्भक ठरेन हें खरं ना? स्वातंत्र्यासाठीं जनतेनं आरंभिलेल्या युद्धांत भाग घ्यायचा मला अधिकार नाहीं? त्या उन्नत कार्यांत मी जीव वेचला तर माझं जन्माचं लांछन निघून जाईल ना? अन् काय जन्मानं अकुलीन असलेलीं माणसं राष्ट्रकार्याला उपयोगी पडत नाहींत?”....

स्वामीजींनीं हास्य केलं होतं. अन् आपला वरदहस्त त्याच्या डोक्यावर ठेऊन ते अंतर्धान पावले होते. रस्त्यानं चालतांना ह्याच स्वप्नासंबंधीं त्याचा विचार चालला होता. आकाशीला व अजीजला हें स्वप्न सांगायला पाहिजे होते. अजीज तर अद्याप गांवाहून परत आला नव्हता. ‘मा’ च्या प्रकृतिबद्दल त्यानं निदान लिहायला तरी पाहिजे होतं. इतक्यांत बाजूच्या एका दुकानांतून त्याला हांक ऐकूं आली. त्यानं वळून पाहिलं तो शाम होता तो! स्वारी बाहेर आली होती तर! घरीं तांदूळ आणि दुसरं थोडं घरगुती सामान न्यायचं होतं. अर्थात् बाबूला थोडं ओझं घ्यावं लागणार होतं. त्याला अद्याप खरंच किती कामं होतीं. त्याला स्वतःचं पत्रक लिहून काढायचं होतं. सत्या-

ग्रहाच्या स्थानिक संचालकाकडून तें मान्य करून घ्यायचं होतं. बाबूचे असे विचार चालू असतांना शामनं दुकानदार आंतल्या खोलींत गेला आहे असं पाहून गल्ल्याच्या पेटीवर सफाईनं हात मारला. हाताला आलेलं एक नोटाचं पुडकं त्यानं खिशांत कोंबलं. खरेदी संपली अन् घरीं येईपर्यंत दोघंही आपापल्या कार्याच्या विचारांत मग्न दिसले. श्यामच्या कोटाजवळच आपले कपडे अडकवून बाबू घरांत पाटपाणी करायला गेला. सौ. सोळनेरकर थोड्याच्या कण्हत होत्या. त्यांचं अर्ध काम बाबूनं केलं तरी त्यांच्या प्रकृतीला आराम पडला नव्हता. मोठ्या कष्टानं अखेर पहिला भात आला. बाबूनं शामला हांक मारली. शाम आपल्या कामांत दंग होता. चांगल्या कोऱ्या करकरीत अडीचशेच्या नोटा ! सोळनेर-करांचा अडीच महिन्याचा पगार ! आतां पाच सहा महिने शामला खर्चासाठीं कुणाच्या तोंडाकडे पहावं लागणार नव्हतं. तोंच कुणाची पाऊलं वाजलीं. त्यानं खिडकीतून पाहिलं. दुकानदार पोलिससह येत होता. भांडं फुटणार या भयानं शामला कापरं भरलं. तो घाईनं उठला अन् तें नोटाचं पुडकं बाबूच्या खिशांत कोंबलं !

पुढच्या घटनांत कांहीं नव्हतं. सारे संस्कार अन् सोपस्कार होऊन बाबूला सहा महिन्यांची शिक्षा सुनावण्यांत आली. बाबू नुसता सुन्न झाला होता. तें कसं झालं होतं, हें कळायला कांहीं मार्ग नव्हता !

बाबूच्या परिचित जगांत चर्चा चालली होती. धन म्हणाला होता,

“तरीच स्वारी आजकाल झोकनोक करित होती. अन् केव्हाही पाहिलं तरी आपल्याच विचारांत दंग दिसत होती ! ”—

जिजी म्हणाल्या होत्या,

" खाण तशी माती ! मेल्याला पाहिलं कीं असा संताप येत होता. पण आमच्या नाल्यांना गरिबांचा पुळका केवढा ! घातली असती एकदां टोपी म्हणजे कळलं असतं ! "

मधल्या सुट्टीत टीचर्स रूममध्यें एक मास्तर सांगत होते,

" मोठं बेरकी पोरगं दिसत होतं ! हुषार असेल हो. पण असे गुण उधळल्यावर काय जाळायची ती हुशारी ! अहो परवाची गोष्ट ! झालंन् काय की पोस्टाच्या फाटकांत त्याची न् माझी भेट झाली. खांद्यावर टाकलेल्या धोतराच्या सोग्याआड कांहीं तरी लपवून चालला होता तो. पैशाची थैली होती ती ! बोला आतां दुसऱ्याच्या घरी तुकडे मोडून खाणाराजवळ कुठून आली ही रक्कम ? बैस म्हणावं लेका आतां मजेत खडी फोडित ! "

मग शाळेत एक सर्क्यूलर फिरलं होतं. बाबूचं नांव शाळेतून काढून टाकण्यांत आलं होतं, त्याच्या वर्तनाची थोडी हकीकत देऊन इतर विद्यार्थ्यांनी असं दुराचरण करूं नये म्हणून ताकीद करण्यांत आली होती.

म्याट्रिकच्या वर्गांत हेडमास्तर इंग्रजी शिकवीत होते.

" Where the mind is without fear and the head is held high, where knowledge is free..........."

तें सर्क्यूलर चपराशानं वर्गांत आणलं तेव्हां हातांतलं पुस्तक त्यांनीं टेबलावर पालथं घातलं. अन् राणीचा जाहीरनामाहि वाचून दाखविला नसेल अशा आवेशांत तें त्यांनीं विद्यार्थ्यांना वाचून दाखविलं.

" झूट ! "

वर्गाच्या एका कोपऱ्यातून एक बंडखोर आवाज आला. तो अजीज होता. तो एकदम उभा राहिला न् म्हणाला, " कोणत्या आधारावर शाळेच्या अधिकाऱ्यांनीं बाबूवर दुर्वर्तनाचा आरोप केला आहे ? "

सीतारामराव ह्या अनपेक्षित प्रश्नानं स्तिमित झाले असावे. त्यांनीं उत्तर दिलं,

" कोर्टाचा सिक्का पडला आहे त्याच्या चारित्र्यावर !...."

" कोर्टात साऱ्या गोष्टी खऱ्याच ठरल्या जातात ? "

" वाद घालायची माझी इच्छा नाहीं ! तुला त्याच्या बद्दल एवढी सहानुभूति असेल तर शाळा सोड न् निघून जा ! "

" लानत है ऐसे मदरसोंपर–( धिक्कार असो अशा शाळांचा ) लांछन आहे अशा शाळेतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ! "

असं म्हणून बाबूला अंतर्बाह्य ओळखणाऱ्या त्या अभिमानी मुलानं तत्काळ वर्ग सोडला ! विद्यार्थी आणि हेडमास्तर क्षणभर स्तब्ध होते. व्हरांड्याच्या फरशीवर अजीजच्या बुटांचा खाडखाड आवाज होत होता. बाबूच्या जीवनावर नसते कलंक उडविणाऱ्या अंध वृत्तींना अन् दुष्ट शक्तींना तो जणूं तुडवीत चालला होता ! ....

शतकं आणि युगं लोटलीं होतीं. शककर्त्यांनीं न् युगप्रवर्तकांनीं इतिहास घडविला होता. त्या प्रत्येक घटनेच्या कालाला साक्षीभूत राहिलेल्या ह्या इमारतीचं कार्य मात्र अखंड चाललं होतं.

खडाळ्याचं सबजेल होतं तें !

बाबू ह्या इमारतीच्या बाहेर पडला होता. त्याच्या गतीत अधीरता नव्हती. तो कुठून तरी निघाला होता. अन् त्याला कुठंतरी जायचं होतं. मागं त्यानं एकवार वळून पाहिलं होतं अन् एक श्वास टाकला होता. त्यांत सुटल्याचं समाधान होतं कीं त्या विराट घरानं यापुढं त्याला आश्रय द्यायचं नाकबूल केलं होतं कोण जाणे !

सदाचार शिकविण्यासाठीं त्याला इथं आणलं होतं अन् अत्याचार करून बाहेर काढलं होतं. चोरीच्या आरोपाखालीं त्याला इथं डांबलं होतं अन् कांहीं मुदतीनंतर त्याला त्याचा नागरिकत्वाचा पोशाख परत केला होता. त्या बंधनानं अन् ह्या मुक्तीनं असं कोणतं सत्य प्रतीत केलं होतं, अशी कोणती सद्भावना जागृत केली होती, कीं जी मानवी जीवनाला मोठी उपकारक होती ?

कांहीं नाहीं ?

न्याय आणि कायद्याचा तो अन्यायी, असत्य आणि रानवट व्यवहार होता !

दिवस उगवत होता. पण त्याचं परिचयाचं जग त्या अभेद्य भिंतीबाहेर कित्येक योजनं दूर होतं ! संध्याकाळ व्हायच्या आंत

बराकीचीं दारं बंद होत होतीं अन् आकाशालाहि व्यापून उरणाऱ्या एका धडाडणाऱ्या उराच्या दाबाखालीं पडावं तसं रात्रभर त्याला वाटत होतं.

रात्रीच्या आकाशाची तर तो कल्पनाच विसरला होता. दिवसभर मरमर करायची अन् रात्रीं अंधारांत आणि अंधाऱ्या बराकींत गुरफटून पडायचं असा त्याचा कार्यक्रम होता. परिस्थितीच्या अशा कांहीं विचित्र रगाड्यानं त्याचं जीवन भरडलं गेलं होतं कीं जणूं एकाद्या विशिष्ट स्थळींच उगवणारं रोपटं भलत्याच प्रदेशांत अन् भलत्याच ऋतुमानांत नेवून लावावं.

या कोंडवाड्यांत माणसांना पिळून काढणारा जो अधिकार होता तोहि त्यानं पाहिला होता. दयेचा तिथं मागमूस नव्हता. कोर्टांतल्या शिक्षेचा छाप लागून जे इथं आले होते त्यांना दडपून ठवायचे नाहींतर झोडपून काढायचं एवढच त्या अधिकाराला माहित होतं.

कांहीं दिवस ऊर फुटेपर्यंत काम करण्यांत अन् मिळेल ते पोटांत घालण्यांत गेले. हळूंहळूं त्याची शक्ती त्याला सोडून जाऊं लागली. नेमलेलं काम नियमानं होईनासं झालं. धमक्या झाल्या. मारहाणीचे प्रयोग दाखविण्यांत आले. त्याची प्रतिकार शक्ती उसळून आली तेव्हां तेथली सत्ता आपल्या सर्वस्वासह त्याच्यावर तुटून पडली!

फाशी देतांना बांधतात तसं एका विचित्र लाकडी चौकटीशी अर्धनग्नावस्थेत त्याला बांधण्यांत आलं होतं. एक रानवट क्रूर माणूस हातात भिजलेला फोक घेऊन उभा होता. वैद्यकीय तपासणीचं सोंग झालं होतं. शिरच्छेदाचीं अन् फाशीचीं वर्णनं बाबूनं वाचलीं

होतीं. बंगाली क्रान्तिकारकांचे तुरुंगातले हाल त्याला आठवत होते. वधस्तंभाजवळ जातांच मुक्तपणानं हसणाऱ्या कुठल्याश्या एका हुतात्म्याचं चित्र त्याच्या डोळ्यापुढं आलं. तें त्याला धीर देऊं लागलं.

तो देहस्थितीवर आला तेंव्हां जाणीवेवर वेदनांचा मोठा जाळ भडकला होता. त्याला सरळ बसतां येणं शक्य नव्हतं. कुणीतरी त्याच्या पाठीवरून हात फिरवित होतं अन् त्याला पाणी पाजविण्याचा त्या नवख्या माणसाचा प्रयत्न चालू होता.

ह्या विलक्षण शिक्षेचे भोग त्याच्या वाट्याला आले होते. अन् ते त्यानं सहन केले होते. पण एक सत्याग्रही म्हणून नव्हे, एक दुर्वर्तनी दुःशील विद्यार्थी म्हणून! कुठं ते हंसत हंसत वधस्तंभावर चढणारे राष्ट्राचे लाडके लाल, अन् कुणीकडे ते गळ्याला तात लागतांच जीभ बाहेर पडून निष्प्राण होणारे डाकू आणि दरोडेखोर! हुतात्म्याचं नांव इतिहासांत अजरामर होतं. दुरात्मे जनतेच्या धिक्काराचा विषय होतात! क्षणिक सहानुभूति तरी त्यांना लाभते कां?

पण, आपल्या पाठीवरून हात फिरविणारा हा दयाशील महात्मा कोण म्हणून बाबू डोळे फाडून पाहू लागला. नंतर त्याच्या स्मृतींत लख्ख प्रकाश पडला. खडाळ्याच्या स्टेशनवर पोलीसाच्या हातून ज्यानं त्याला सोडविलं होतं तोच तो माणूस! काय चमत्कार पहा! आपलं चारित्र्य कितीही उज्वल राखलं तरी एकाद्याच्या मनांत त्याचं चांगलं प्रतिबिंब पडण्याची संधीच येत नाहीं. हा त्या व्यक्तित्वाचा कीं परिस्थितीचा दोष म्हणावा?

त्या नवख्या माणसानं बाबूला पहिल्यांदा पाहिलं होतं तें एका पोलीसाच्या ताब्यांत अन् तिकीट नव्हतं म्हणून. अर्थात् नागरि-

कत्वाला न शोभेल असा त्यानं गुन्हा केला होता म्हणून. किंवा तो तसा सिद्ध झाला म्हणून. आतां तर त्यापेक्षां फार मोठा आरोप बाबूच्या चारित्र्याला चिटकला होता. लहान लहान गुन्हे पचवितां पचवितांच मोठे गुन्हे करायला माणूस प्रवृत्त होतो नाहीं तर काय ? त्या नवरूया गृहस्थाची दयाशील वृत्ती मात्र कायम होती. अन् बाबू ? तो दुराचाराच्या काठावरून हिंडत हिंडत ठेंच लागून कर्दमांत पडला होता !

त्या माणसानं बाबूला ओळखलं. थोडक्यांत त्यानं आपली हकीकत बाबूला सांगितली. तो कुठल्याशा सरकारी शाळेत मास्तर होता. ह्या सत्याग्रहाच्या चळवळीला त्यांनीं शक्य तेवढं सहाय्य केलं होतं. अन् संधी येतांच खुशाल सरकारी नौकरीवर लाथ मारून सत्याग्रह केला होता. हा खराखुरा त्याग होता अन् धन्योद्गाराचे त्यावर पुष्पहार चढले होते ! .......

बाबूला आपली कथा सांगण्याची वेळ आली. ती रोमांचकारी नव्हती, किंवा त्यागाचं धगधगतीं स्थंडिलंच वाटतील अशी कोणतं कृत्यं त्यानं केलीं होतीं ?

आपलं दैन्य त्याला प्रगट करावसं वाटलं नाहीं. "मास्तर कृपा करा, अन् मी इथं कां आलों हे मला विचारूं नका !"

अशी उत्तरादाखल त्यानं कळकळीची विनंती केली. मास्तरांनीं अधिक हट्ट धरला नव्हता. तो कोणत्या आरोपाखालीं जेलमध्यें आला आहे याची त्यांना कल्पना आली होती. त्याला अधिक लज्जित करण्यांत अर्थ नव्हता. मनुष्य स्वभाव आज नाहीं उद्या सुधरेल, असा त्यांना बलवत्तर विश्वास असावा !

आपल्या दैन्याची लज्जा बाबूवर असा कांहीं पगडा बसवूं लागली कीं, कुणाला तोंड दाखविणं किंवा कुणाशी बोलणंहि त्याला बरें वाटेना.

कांग्रेसच्या सत्याग्रहींना पुष्कळ सवलती मिळूं लागल्या. अन् कित्येकांनीं झगडून आणखी मिळविल्या. ते राष्ट्रगीत गात असत, राष्ट्राच्या भवितव्याची चर्चा करीत असत. उपवास पाळीत अन् व्याख्यानं देत असत. बाबूला त्यांच्यांत बसायला काय अधिकार होता. तो गेला असता तर प्रत्येकानं त्याच्याकडं संशय ग्रस्त नजरेनं पाहिलं असतं. अन् तत्काळ रोखठोक आवाजांत त्याला सुनावलं असतं,

" स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या सैनिकांच्या साऊलीला देखील उभं राहाण्याची तुझी लायकी नाहीं ! चल दूर हो ! आमचा स्वार्थत्याग बघ अन् तुला लागलेले तुझ्या कुकर्मांचे डाग बघ ! .... "

त्याच्या कोवळ्या मनाला लागलेला हा आघात फार जबरदस्त होता !

नातलग भेटायला आले कीं कैद्यांची उडणारी आतुर धांदल अन् धावपळ त्यानं पाहिली होती. त्याला भेटायला येणारं जगांत कोण होतं ? पण तसं म्हटलं तर अजीज त्याला भेटण्यासाठीं आला होता. पण बाबूनं त्याची भेट टाळली होती !

त्याच्या ओंगळ कृत्याचा तो जाब विचारायलाच आला नसेल कशावरून ?

" बाबू काय करून बसलास हें ? " असं प्रथम दर्शनींच म्हटलं असतं त्यानं. त्याला समर्पक उत्तर द्यायला बाबूजवळ असं कोणतं कारण होतं ?

पण अजीज तसाच निघून गेल्याचं कळल्यावर मात्र त्याला वाईट वाटूं लागलं.

अंतर्मनांतल्या गोष्टी उघड करतां येतील इतकी त्यांची मैत्री दृढतर झाली होती. दोघांनीं मिळून आपापल्या विचारांच्या मगदुराप्रमाणं राष्ट्राच्या भवितव्याची चर्चा केली होती. बेत केले होते. परस्परांच्या कार्याला प्रोत्साहन दिलं होतं.

खरंच असं तेंच एक ठिकाण होतं कीं बाबू निर्दोष आहे अशी खात्री पटावी !

पण अजीज निघून गेला होता. अन् आपण निष्पाप असल्याचे पटवाक्याची एक सुसंधी त्याच्या बरोबर चालती झाली होती.

पुढं त्याचं त्याला एक पत्र आलं होतं. पण जेलरकडून त्यांत इतकी खाडाखोड झाली होती कीं, वर त्याच्या मामाचं नांव, तारीख, आदाब अर्ज आणि अजीजखेरीज कांहीं वाचतां येईल असं कांहीं राहिलं नव्हतं.

एका अट्टल दरोडेखोराला त्याची बायको भेटायला आली होती. तो दरोडेखोर होता हें जगालाच काय पण तिलादेखील माहित होतं. पण तिची त्याच्याबद्दलची सहानुभूति किती असीम होती ! त्याची दुरवस्था पाहून तिचे डोळे पाण्यानं भरून आल्याशिवाय राहिले नव्हते.

तें दृश्य आणि ते विचार कधींकधीं त्याच्या मनांत येत. मग बराकींतल्या त्या गडप अंधारांत स्मृतींच्या अन् विचारांच्या तीव्रतेने एक प्रकाशवलय निर्माण होऊन आकाशीचा चेहरा त्याला दिसूं लागे. एकाद्या जिवंत प्रतिभेचं स्फूर्तिनिधान देखील इतकं सुंदर होतं किंवा नाहीं कोणजाणे !

राजकीय लढ्यांत समेट झाला होता. सरकार सुधारणा द्यायच्या विचारांचीं अंडीं उबवीत होते. हळूंहळूं सत्याग्रहींची सुटका होऊं लागली. त्यांच्या समाधानाला न् आनंदाला कांहीं सीमा नव्हत्या. मास्तरांना जातांना बाबू मुळींच भेटला नाहीं. सुटल्याच्या आनंदांत अन् इतर मित्रांच्या गराड्यांत त्यांना बाबूची आठवण कुठून राहायला ? एक दिवस बाबूची देखील सुटका होणार होती. पण कोणता आनंद घेऊन तो बाहेर पडणार होता ? तो जाणार होता कुठं ? अन् त्याचं सहास्य स्वागत करायला कोणत्या दारांत कोण उभं होतं ?....

अन् हेंच शरमेचं, एकाकीपणाचं दाहक दुःख घेऊन बाबू जेल बाहेर पडला होता.

संध्याकाळ झाली होती. आकाशाचा केवढा मोठा स्वच्छ निळा भाग त्याला दिसून आला होता. पश्चिम क्षितिजावरला रक्तिमा मावळला होता. अन् जवळचे धूसर ढगांचे तुकडे एखाद्या तपस्व्याच्या जीवनावर अधमांनीं उडविलेल्या शिंतोड्यासारखे दिसत होते."

पलीकडच्या पटांगणांत मुलांनीं मांडलेला हुतुतुचा डाव अद्याप मोडला नव्हता.

एक म्हणत होता,

"पांडू, उगीच बाबू दडक्यासारखी धडक घ्यायच्या नादीं लागूं नकोस !"

अशा रीतीनं कां होईना जगांत त्याची आठवण निघत होती तर !

पण पुढं त्या मुलांनीं केलेलं त्याच्या चारित्र्यावरील भाष्य ऐकून तर त्याच्या काळजाला घरं पडलीं होतीं.

अंधार पडूं लागला होता. अंधार म्हणजे खरंच केवढा सर्वगामी अन् सर्वांबद्दल सहानुभूति बाळगणारा होता. प्रकाश हे सत्याचं गमक मानलं जातं. पण तो मोठा दुष्ट आणि अंतर्भेदी असावा. हें चांगलं हें वाईट असं निक्षून सांगायचा त्याला केवढा हव्यास! अंधाराचंच सर्वत्र आणि सर्वकाळ राज्य असतं तर लौकिक समजुतीप्रमाणं असत्य आणि अनाचारांना ऊत आला असता. पण तपोनिधींना आणि अनघांना खोट्या दुर्लौकिकांच्या तीव्रतर झळा मात्र मुळींच सहन कराव्या लागल्या नसत्या! ह्या अंधारांतच आपण कुठंतरी गडप होऊन जावं असं क्षणभर त्याला वाटलं.

पण ऋणानुबंधाच्या ओढीची धुगधुग मनांत थोडीशी कायम असावी. कारण गांवाच्या रोखानं त्यानं आपला पाय उचलला होता. पोशाख साफसूफ केला होता. जणूं आतां तो नागरिक झाला होतान् काय? पण पोशाखांत साफसूफ करण्यासारखं होतं तरी काय? सहा महिने हा पोशाख जेलमध्यें पडून होता. शर्टचीं बटणं पार नाहींशीं झालीं होतीं. कोटाचा एक खिसा कुरतडला गेला होता. खास अजीजच्या 'मा' नं विणलेलं कापड होतं तें. पण जेलमधल्या उंदरांना त्याची काय कल्पना? एवढ्या चांगल्या कापडावर त्यांनीं खरंच केवढे अत्याचार केले होते. एका चपलेच्या अंगठ्याचा भाग अजिबात उघडला गेला होता. एक पाय त्यामुळं त्याला अतिशय जपून टाकावा लागत होता. अन् त्या तुटक्या पायतणाला त्या तशा दुरवस्थेत वाहून नेतांना फरफटण्याचा असा कांहीं विचित्र आवाज होत होता कीं जणूं आपणहून चारचौघांत त्याचं दैन्य ती उघड करून सांगत होती!

चौधरी वकीलांनीं घरं बदललं होतं कीं काय ? त्यांच्या घरांत एक मार्केट इफीसर रहायला आला होता. पूर्वी धान्याची त्या घरांत तूट होती. पण आतां तिथं धान्याचे बाजारभाव अन् आवक जावकाचे केवढे जंगी आराखडे चालले होते !

नाख्यांच्या दिवाणखान्यांत बिछायतीची गडबड चालू होती. पेटी तबला कुणीतर वाहून आणला होता. अन् एक व्यवस्थापक सदस्य पेट्रोमॅक्स पेटविण्याचं दिव्य करीत होता.

सोळनेरकरांच्या घराचं दार उघडंच होतं. पण त्या घरांत त्याची अशी काय बडदास्त ठेवली होती ! बाबूनं केलेलं कृत्य प्रत्यक्ष आपण डोळ्यांनीं पाहिलं असल्याचं शामनं शपथपूर्वक कोर्टांत सांगितलं होतं !....

सोनफुल्यांच्या घरांत अंधार होता. कुठंतरी अंतराळांत अन् अज्ञातात रेंगाळणाऱ्या मृत्यूनं आपलं टाकून ठेवलेलें कार्य उरकलं होतं कीं काय ?

गाजऱ्यांच्या घरांत खिडकीचं दार हलकेंच उघडलं गेलं होतं. बाबूनं पाहिलं तों ती बेबी होती. तिची संगीत आराधना, तिचं शिक्षण कसं चाललं होतं कुणाला माहित ? ती आपल्या शिक्षकाला काय विसरली होती ? अन् हें काय ? तिच्या चेहऱ्यावरचा सारा खेळकरपणा मावळला होता !

“ बेबी ! ” बाबूनं खिडकीखाली जाऊन हांक मारली अन् म्हटलं, “ ठीक आहेना ? ”

“ कोण ? बाबू ? ” तिनं एक दीर्घ उसासा टाकला. दुःखांत चूर असलेल्या माणसाचं गांभीर्य तिच्या चेहऱ्यावर दिसलं.

" तुला आतां या घरांत आश्रय मिळणं शक्य नाहीं बाबू ! मोठं किटाळ आहे तुजवर ! " बेबीनं त्याला नवीन असं काय सांगितलं होतं ? त्या किटाळासाठींच तर त्याला ही शिक्षा झाली होती. त्यानं तिथून पाय काढला तेव्हां तिचा एक चमत्कारिक हुंदका मात्र त्याला ऐकूं आला.

सौ. खुशाल व्हरांड्यांत एकट्याच उभ्या होत्या बाबूला दारापुढून जातांना त्यांनीं पाहिलं कीं काय कोण जाणे. त्याला जवळ बोलावलं. थोडीशी औपचारिक विचारपूस करून म्हटलं,

" खाल्ल्या घरच्या अन्नाला चांगला जागलास म्हणायचा ? "

पुढचे शब्द ऐकण्याला बाबू तिथं नव्हता !

त्यांची नेहमीची आळसावलेली दुपार फार दुःसह झाली होती कीं त्यांत आणखी कांहीं होतं ? बेबी काय किंवा सौ. खुशाल काय आकारविकारांच्या भौतिक प्रतिमा होत्या इतकंच. त्यानं दारांत पाय ठेऊन आंत नजर टाकली. घरांत पूर्वीं इतकाच प्रकाश आणि प्रसन्नता होती बँकर घरांत नसावेत. बाई न् आकाशी देखील खालीं दिसत नव्हत्या. त्या घरांतल्या मंडळींनी खरोखर त्याला आपलेपणानं वागविलं होतं अन् ' मी आहे ना ! ' म्हणून केवढी जिव्हाळ्याची भावना व्यक्त केली गेली होती !

त्या साऱ्या सत्वगुणी मंडळींना भेटल्या शिवाय त्यानं जेल मधून बाहेर वाहून आणलेला मनस्ताप मुळींच कमी होणार नव्हता.

त्याची चाहूल लागूनच कीं काय, कुणीतरी आंतून येतांना दिसलं,

' आकाशी ! ....

कपड्याआड झांकून ठेवलेलं प्रियजनाचं चित्र कित्येक दिवसा नंतर उघडून पाहिल्यावर वाटावा तसा आनंद बाबूच्या डोळ्यांत क्षणभर लुकलुकला. तिच्या रुपाच्या रेषा केवळ्या रम्य रीतीनं अन् केवळ्या हळुवार गतीनं विकसित होत आल्या होत्या. फक्त कळ्यांनीं न् फुलांनींच ह्या विकसनाचं अन् विकसनाच्या उल्लासाचं रहस्य जाणावं अन् जगाला उकलून दाखवावं. रविवर्म्याच्या चित्रा सारखी ती चेहऱ्याची घाटणी अन् आकाशी रंगाच्या आवरणांतला यौवनोल्लास ! – किती नितांत मनोरम ध्यान होतं तें !

वृथा लांच्छनाच्या दुःखाचीं, मनस्तापाचीं, उदासीनतेचीं, अन् मनःकल्पित शंकाकुशंकाचीं कित्येक वादळं झालीं होतीं. वावटळी सुटल्या होत्या. अन् त्यामुळं बाबूच्या अंतःसृष्टीचा मोठा संहार झाला होता. पण त्या उध्वस्त विश्वावर आकाशीचा नुसता एक दृक्पात झाला अन् बाबूनं तोंडातून शब्द काढायचा प्रयत्न केला,

" आकाशी ! "

पण तो प्रयत्न नीट जमला नाहीं. कारण आकाशीच्या डोळ्यांत अश्रू चमकले होते.

बाबूच्या दूरतेचं अन् दुरावस्थेचं ती दुःखच प्रगट करीत नऽव्हती तर काय ?

" आकाशी, दुःखभोग. माझ्या वाट्याला आले ते मी सहन केले. तूं त्याबद्दल दुःख करावंसं हें कांहीं तुला शोभत नाहीं अन् मला नाहीं सहन होतं ! "

लबाड ! ढोंगी ! त्यानं तिच्या काळजावर केवढे आघात केले होते ह्याची त्याला कांहीं कल्पना ? कांहीं लज्जा ?

खसकन् तिनं जवळच्या टेबलाचा खण उघडला. एक पत्र काढून त्याच्या हातांत दिलं अन् गद्गद् स्वरांत म्हटलं,

बेबीला प्रेम पत्र लिहिणं तुला शोभतं अन् सहन करवतं नाहीं ? तिचा केलास तसा घात तरी करावयाचा नसतास ? जा. तोंड पहावसं वाटत नाहीं मला तुझं आतां ! "

अन् तिनं इतक्या जोरांत दार बंद केलं होतं कीं, त्या धडा-डीनं आकाशाला देखील मोठा जबर धक्का बसला असावा. कारण तितक्यांत एक चांदणी निखळून पडली होती. आकाशीच्या आस-न्यानं तिला लागलेलं ईश्वरत्व नाहीसं होऊन तिचा सारा, प्रकाश क्षुद्र, भौतिक बुजबुजाटांत लुप्त झाला होता : ...

वर आंथरूणाला खिळलेल्या बाईनीं आकाशाला विचारलं होतं,

" केवढ्या जोरानं दार वाजलं ग ? "

आकाशी कांहींच बोलली नव्हती ?

" बाबू ? ये, आंत ये, सुटलास वाटतं आज ! "

दारांत बाबूला पाहून प्रल्हाद धनानं त्याचं स्वागत केलं !

तीच ती तीन खणी भाड्याची खोली होती. पण तिला आतां संसारी घराचं स्वरूप आलं होतं. कुठं आडपडदा नव्हता. अन् पडदा करण्यापुरती त्या खोलींत जागा तरी कुठं होती ?

पलीकडच्या कोपऱ्यांत एक सूचक दृष्टिक्षेप करून धन म्हणाला,

" मी आतां संसारी झालो आहे बाबू !

मी पुनर्विवाह केला म्हणून गांवांत केवढं वादळ झालं ! माझ्या संगीताच्या शिकवण्या सुटल्या. ही मास्तरीण आहे म्हणून चाललं आहे आमचं मजेत ! "

सोंधन त्यांना बोलायला मोकळेपणा असावा म्हणून लुगुलुगु चालत बाहेर गेल्या होत्या. बाबूनं विचारलं,

" माझं सामान आहे ना ? "

" आहे थोडंबहुत. मला फार वाईट वाटतं बाबू ! तूं तर अशा अवस्थेत निघून गेला होतास ! अन् मी तर अतिशय अड-चणींत होतो. काय करणार मग ? ह्या भाड्यासाठीं मला तुझी पेटी अन् पुस्तकें विकावीं लागलीं. आले थोडे पैसे अन् भागविली झाली नड ! आतां मात्र बरं आहे. हिचा महिन्याचा पगार कसं तरी बेताबातानं केलं तर पुरतो मात्र, खरंच या प्रेम विवाहामुळं मी फार सुखी झालो आहे बाबू !

"वयानं माझ्यापेक्षां ही थोडीशी मोठीच आहे. पण प्रेम म्हटल्यावर ह्या फालतू गोष्टी काय लक्षांत घ्यावयाच्या असतात ? अन् काय रे, गावांत तर तुझ्याबद्दल भयंकर गुणगुण आहे. बेबीचा न् तुझा लोक संबंध जुळवितात ! काय लबाड आहेस तूं ! आम्ही मात्र तुला अगदीं मनातल्या गोष्टी सांगाव्या अन् तुला मात्र तुझं रहस्य मजजवळ देखील प्रगट करावस वाटलं नाहीं, नाहीं ! कांहीं म्हण बाबू ! मला फार वाईट वाटतं तुम्हा दोघांबद्दल ! पैशासाठीं तूं दुसरा कांहीं तरी मार्ग काढायला हवा होतास ! म्हणजे बेबीला न् तुला मजेत पळून जातां आलं असतं ! बिचारी बेबी ! मातृत्व लागायाचा कलंक घेऊन आतां दुःखी झाली असेल ! घरचाच डाक्तर होता म्हणून सोड ! पण खरंच एकूण मोठी चमत्कारिक कथा ! प्रेमाचे मार्ग संकटमय असतात असं कांही कुठं म्हटलं आहे ना ! अन् हो बरी आठवण झाली ! त्या आकाशीला देखील

अकारण हुरहुर लावली होतीस तूं ! बेबीबद्दल तिचं चांगलं मत कां नसावं याचं मला आश्चर्य वाटलं. कारण बेबी माझी शिष्या ! अन् तुझी म्हणजे माझ्या एका मित्राची प्रेयसी ! योगायोगानं तूं तिला लिहिलेलं एक पत्र मला आठवलं ! काय झोकदार तुझी भाषा ! तुझी लेखक लोक म्हणजे बस ! मेळ्यासाठीं संवाद लिहून दे म्हणून तुला मी कित्येकदां विनवलं होतं ! अहाहा काय तीं वाक्यं ! मी तर अगदीं चाट झालो बुवा ! काय बरं, ' हें मनोदहन मी कुठवर सहन करूं ! ' तें पत्र मी घेतलं अन् चक्क आकाशीला दाखविलं. तूंच विचार कर. बेबीबद्दल भलतंसलतं बोललेलं तुला सहन झालं असतं ? अर्थात् तुझा मित्र म्हणून मला तरी तें कसं होणार ? नाहीं तर नाहीं म्हटलं पेटीची शिकवणी ! "

धनाचं ऊर रिकामं अन् हलकं झालं होतं कीं काय कोण जाणे ! त्यानं सिगारेट पेटवून आंत धूर भरून घ्यायला आरंभ केला होता !

बाबूच्या काळजांत सहनशीलतेचा कुठं कोणता भाग कायम राहिला असावा ! त्यावर करायचीं उरलेलीं क्षतं ह्या गिधाडानं केलीं होतीं. त्याचं तें लांबलचक भाषण थांबलं होतं. पण तो काय काय ओकला होता, ह्याची त्याला कांहीं कल्पना होती ?

बाबूनं कोपऱ्यांत पडलेल्या अंथरुणाला हात घातला.

" कुठं जाणार बाबू तूं आता ? "

बाबूनं जावं अशी ती सूचनाच होती.

" ही खोली आधींच लहान ! आपल्या साऱ्याचा इथं समावेष कसा होणार ! अन् आमचा तर नुकताच प्रेमविवाह झालेला !

तुला देखील असंच सुखी होतां आलं असतं बाबू ! "…. इतक्यांत मास्तरीण दारांतून परतली होती. बाबू वळकटी घेऊन पायऱ्या उतरूं लागला. निरुंद खुराडातल्या त्या टिचभर संसारांत खरंच बाबूला कुठून अवकाश असायला ? ….

गलित आणि श्रान्त अवस्थेत पडत असलेलं त्याचं पाऊलं धर्मशाळेकडे वळलीं होतीं. त्याला समंजस लोकांत यायचं होतं तेव्हां त्यानं पहिला मुक्काम ह्याच धर्मशाळेंत केला होता. ही लोकेषणा आतां निमाली होती. लोकप्रवादाचं शेवाळं तेवढं चिटकल्यामुळं जगातून बाहेर जाण्याची इच्छा उद्भवणं अनैसर्गिक नव्हतं. त्यासाठींच त्याला शेवटची रात्र धर्मशाळेंत काढायची होती कीं काय ? किती विचित्र योगायोग ! जिथं एका रात्रीं भावी जीवनाचे त्यानें मनोरे रचले होते तिथंच तो आतां उध्वस्त मनोगतांची रक्षा घेऊन येऊं लागला होता !

ह्या निराधार आणि निराश्रिताचं त्या पडक्या धर्मशाळेच्या खुल्या दारानं अन् खुलेपणानं खच्चून भरलेल्या थंडगार अंधारानं स्वागत केलं. पूर्वीसारखा तिथं आतां ओंडका जळत नव्हता. भटक्या उपाशी श्वानाची घरघर ऐकूं येत नव्हती. वडाचं झाड मात्र होतं तसंच कायम होतं. त्यावर रात्र पाखरूं हुंकारत होतं. अंधाराच्या बुरुजावरून पहारा करणाऱ्या काळपुरुषाचं नरडं तर खरारत नव्हतं ना ?

काळपुरुषाचं सानिध्य कल्पूनच कीं काय बाबूनं आपली शय्या केली.

गेल्या सहा महिन्यांचीं सहा युगं लोटलीं होतीं. अन् आज आपल्या चिरपरिचित शय्येवर बाबू पडला होता !

एखाद्या प्रेमनिर्भर वत्सल जननी सारखी तिथं त्याची तिनं आजवर सोबत केली होती. अनैतिक जन्माच्या विचाराचं दहन अन् लौकिक उपेक्षेचं दुःख भडकलं कीं त्या उघडवासी कोवळ्या जिवाला क्षणभराचाच कां होईना पण निवारा द्यायला ही शय्या अगदीं हात पसरून तयार! परिक्षांतून अपेक्षिलेलं यश मिळत गेलं. मनोधर्माचा कांहीं निराळा आणि नवाच फुलोरा फुलवीत तारुण्य आलं. स्त्रीच्या साऱ्या मार्दवाचं, संमोहाचं अन् सौंदर्याचं अप्रतिम प्रतिक आपल्या साऱ्या अलंकार विशेषासह आकाशीच्या रूपानं त्याच्यापुढं प्रगट झालं. अजिजसारखा त्याला मित्र मिळाला. स्वामिजींसारख्या लोकोत्तर पुरुषाचं जन्मांत पहिल्यांदाच दर्शन घडलं. राष्ट्रसेवेची अत्युन्नत आकांक्षा मनांत भडकली. त्या त्या स्थितीचं अन् स्थित्यंतराचं मनोमय सौख्य त्याला इथंच मुक्तपणानं लुटतां आलं होतं.

आजहि तीच त्याची शय्या सहाय्याला धावून आली होती. व्यथांनी अन्तःकरण शतशः विदीर्ण झालं होतं. श्रमानं शरिरांत कांहीं त्राण उरलं नव्हतं. पण या शय्येनं त्याला अगदी स्नेहभरानं कवटाळलं न् म्हटलं, "मला माहित आहे, जगाच्या कोलाहालात तूं गुदमरून गेला आहेस! पण त्या जगाचं वारंदेखील तुला आतां बाधणार नाहीं!"........

पण हा आधार अनंतकाळचा नव्हता. अन्तकालींच ठरला तर तो खरा ठरत असावा. त्याला ताप चढला होता. ग्लानी येत होती. मधूनमधून अर्धवट जागृतीचे फटकारे बसत होते. हे वेदनामय अस्तित्व कुठं कोणत्या अंतराळांत नेऊन बुडवलं तर तात्काळ निघून जाईल हें तो मिटल्या डोळ्यांनीं चांचपून पहात होता. खरंच

साऱ्या जाणीवनेणीवांचा, साऱ्या सुखाभासाचा अन् दुःखमूळांचा एकदम एका घडीला संहार करणारी अशी कोणती अवस्था अथवा अनुभूति होती ?

त्या तशा अर्धवट ग्लानीच्या अन् अर्धवट जागृतीच्या अवस्थेत तो कुठंतरी वर ऊंच गेला अन् खाली पाहूं लागला.

कुठली तरी भिन्नलिंगी माणसं एकत्र आलीं होतीं. त्यांचे शरीर-धर्म सफल झाले होते. निसर्गानें करूं नये तीच अखंड चूक आतांहि केली होती. नऊ महिने लोटले होते. कळा लागल्या होत्या. अन् त्या वेदनांतून हाडामासाचं संवेदनशील स्वरूप उदीयमान झालं होतं. जीवन म्हणून जगाला त्या स्वरूपाची जाणीव झाली होती. पण तें लोकसिद्धीच्या अन् लोकनीतीच्या कल्पनेच्या चौकटीत बसत नव्हतं. म्हणून त्याची सारखी पारध होत होती. नंतर त्यावर मिथ्या कलंकाची कैक पुटं चढून लोकप्रवादांचा नुसता खकाणा भरून आला होता. अन् तें इतकं त्याज्य आणि वाहण्यास जड झालं होतं कीं, त्याच्या गदमदाटातून कायमचं मोकळं होण्यासाठीं बाबू दडक्यानं दृष्टीआडच्या खोल अवकाशांत तात्काळ उडी ठोकली. त्याला सावधपण आलं होतं तें दवाखान्याच्या एका खोलींत !

धर्म शाळेंत कोण कोण अधिकारी ( ! ) माणसं उतरतात ह्याची नेहमींसारखी नोंद घ्यायला एक पोलीस तिथं आला होता. तापानं फणफणत पडलेली ही 'बला' कुठं पंचनामाच्या भानगडी करायला लावील म्हणून त्यानं बाबूला दवाखान्यांत आणून टाकलं होतं !

दवाखान्यातल्या हवापाण्यावर आतां दिवस चालले होते.

बोलून चालून सरकारी दवाखाना तो ! डॉक्टरांचा पगार न चुकतां पहिल्या तारखेला दिला जात होता. पण तेथल्या दवाखान्यांत रोग्यांना बरं करणारीं द्रव्यं मात्र क्वचित्च आढळत होतीं. जिवंत राहण्याच्या कळा घरीं पडून सोसवत नसाव्यात म्हणून मृत्यूशी निकट मध्यस्ती करणाऱ्या ह्या रोगमहालांत रोगी येत असावेत नी काय ?

बाबूच्या नशिबानं म्हणा, किंवा त्याच्यासंबंधीं कांहीं खोल आकर्षण निर्माण होऊन नर्सनं केलेल्या रदबदलीमुळं म्हणा, बांधल्यापासून मुळींच उपयोगांत न आणलेल्या आयसोलेशन वार्डातली एक खोली त्याला मिळाली होती.

मृत्यूच्या या माहेरघरांत जिवंतपणातल्या अन् मृत्यूत्तर देखील कित्येक भानगडी केल्या अन् निस्तरल्या जात होत्या. प्रतिष्ठित पोशाखांतलीं सारीं कुकर्म काचेचीं कवाडं असलेल्या खोलींत उघड्यावर विच्छेदिलीं जात होतीं. आदर्शनीय शीलांचे अनैतिक कलंक इथं धुवून टाकले जात होते अन् छपवून ठेवले जात होते. धर्माच्या अथवा अधर्माच्या भानगडीत पडून मृत झालेलीं माणसं आधीं इथं येत होतीं. अन् नंतरच त्यांचं दहन अथवा दफन होत होतं. दवाखान्याला जोडलेल्या मॅटरानिटी वार्डातून अथवा इतर खोल्यातून जीवनाचे उत्सव अथवा मृत्यूच्या किंकाळ्या पाहून अथवा ऐकून येणाऱ्या नर्सनं बाबूला कित्येक गमती सांगितल्या होत्या !

नर्स !

खडाळ्यांतल्या वास्तव्यांत ‘नर्स’ या नामाभिधानाची दोन तीन ध्यानं बाबूच्या स्मृतींत कोरलेलीं होतीं.

व त्या लोकवस्तीच्या भागांतून केव्हां केव्हां एक तांगा जात होता. लोकांचं लक्ष त्याकडं हटकून जात होतं. आंत मोठं गांभीर्य प्रगट करणारी अन् जगाकडे तुच्छतेनं पहात असलेली अशी मद्र-देशीय मदालसा आढळून येत होती. ती त्यावेळची दवाखान्यातली नर्स होती ! वेश आणि व्यक्तित्व असं होतं की रोग्याच्या मनावरचं मृत्युभयाचं दडपण खात्रीनं वाढावं ! दुसरा एक अवतार खड्या-क्यातल्या बाजार ओळीतून अथवा वर्षाकाठीं भरणाऱ्या उरुसांतून आपल्या ठेंगण्या, बिटक्या नाकाच्या जोडीदाराबरोबर भटकतांना अन् एक चतुर्थांश इंग्रजी अन् तीन चतुर्थांश आंध्रभाषा बोलतांना दिसत होता. बाबू सध्या जी नर्स पहात होता ती शुद्ध मराठी बोलणारी अन् कष्टाळू दिसत होती.

ती नियमानं येत होती अन् चौकशी करीत होती, "काय, ठीक आहे ना ?"

ठीक नसलं तरी उत्तरादाखल बाबूकडून होकारार्थी उत्तर मिळत होतं.

प्रथम तिच्या येण्याजाण्याबद्दल तो विशेष ददात घेत नव्हता. पण मग तिच्या येण्याची तो वाट पाहूं लागला. तिनं लौकर जाऊं नये असं त्याला वाटूं लागलं. पूर्वेकडच्या तावदानांतून प्रकाश फाकायला उशीर कीं वाजलंच समजावं तिचं दारांत पाऊल ! पांघरुणाबाहेर त्यानं तोंड काढून पाहिलं कीं तो प्रकाश आणि तिचा उल्हसित चेहरा एकदम त्याला दिसून आला होता. मधून मधून मन थोडसं उत्प्रेक्षशील होत होतं. आधीं प्रकाश दिसत होता कीं, त्या परिचारिकेच्या मुखावरून आपण प्रकाशाची कल्पना करीत

आहोंत हें कित्येकवेळां त्याला ठरवितां येत नव्हतं ! साऱ्या विश्वाला सचेतन करणारा कांहीं अपूर्व उन्मेष ती आपल्या नेत्रातून ओतीत येत होती कीं काय ?

अन् नवल असं कीं, इतर खोल्यांतून थांबणार नाहीं इतका वेळ नर्स ह्या खोलींत थांबत होती. 'दडके' हें रोग्याचें नांव ऐकल्यावर ती दचकली होती. तें लक्ष्यांत ठेवून बाबूनं विचारलं होतं

" माझं नांव ऐकून तुम्ही इतक्या दचकल्यांत कां ?"

" आतांपर्यंत ऐकलेल्या नांवांत तें थोडें निराळं वाटलं म्हणून !"

" आहे खरं निराळं. दुष्कृत्यांची एक मोठी मालिका आहे त्या मागं !"

नर्सनं त्या वाक्यांतून कांहीं विपरित अर्थ काढला होता कीं काय न कळे !

मग एक दिवस अजिबात ती आली नव्हती. डाक्तर चिकित्सेचे अन् उपचाराचे नानाविध प्रकार करून चालते झाले होते. तें सारं काव्यहीन अन् अति कंटाळवाणं होतं. त्यांत कुठं सौंदर्याला वाव नव्हता. संध्याकाळीं मग कुठं दवाखान्यांतलीं आवरणं झुगारून नर्स आली होती अन् तिनं विचारलं होतं,

" कसं वाटतंय् आज ?"

" अति वाईट !"........

" कां ?"

" तुम्हीं आला नाहींत म्हणून !"

" एका आईची मुक्तता करण्यांत वेळ लागला मला !"

जरा वेळानं बाबूनं विचारलं होतं,

"नर्स ! आई आहे तुम्हांला ?"

"नाहीं !"

"आई विषयीं आठवणी तरी येत असतील मनांत ?"

"पुष्कळ !"

"मला मात्र आईसंबंधीं कांहीं कल्पनाच करतां येत नाहीं. आईचं वात्सल्य अन् जिव्हाळा वर्णन करणारे सारे शाब्दिक प्रकार मी डोळ्याखालून घातले. पण खोल अथवा तीव्रतर असं कांहींच वाटत नाहीं. माझी आई—लहानपणींच मला टाकून गेली आहे. त्यामुळं कांहीं वाटलंच तर तिजबद्दल तिरस्कार मात्र वाटूं लागतो.

नर्सनं आपली दृष्टि कचित् निरवधान केली होती. अन् क्षणानंतर म्हटलं होतं,

"समज उद्या तुला तुझी आई दिसली तर ?"

"ती आईच आहे हें मी ओळखणार कसं ? ती असेल तरी कशी ?"

"अशी माझ्या सारखी !"

"तुमच्या सारखी ?"

"कां ? आईचा वाटतो तसा माझाहि तिरस्कार वाटूं लागला आहे तुला ?"

"छे ! असं कसं म्हणतां ?"

"मग मी आईच आहे अशी कल्पना कर घटकाभर !"

नर्स त्याची आई ? कांहीं तरीच ! बाबूच्या अंगावरलीं लांच्छनाचीं लक्तरं रात्रीं तिला दिसत नव्हतीं ! ह्या नर्सेस म्हणजे मोठ्या लाघवी आणि वेल्हाळ ! मृदुता आणि सौंदर्याची शिंपण घालीत

रोग्यांना जगवावायचं हा त्यांचा धंदा. रोग्यांना मृत्यूचं भय जाणवूं नये म्हणून केवळ्या प्रेमळपणानं त्या त्याची शुश्रूषा करतील. मायेच्या लौकिक उणीवांनीं त्याच्या श्रांत दुबळ्या मनावर वाईट परिणाम होऊं नये म्हणून सौजन्याचे अन् सहानुभावाचे केवढे देखावे निर्माण करतील.

आजारानं कमालीचं आर्तत्व आलेल्या डोळ्यांनीं बाबू आपल्या क्षणभराच्या मातेकडं पहूं लागला.

थोडासा सुकटा देह आणि मोठा सुस्वभाव प्रगट करणारा तो सुप्रसन्न चेहरा–ध्यानावस्थेंत दिसणारं तेजाचं आरक्त वर्तुळ पदराच्या किनारीनं त्याभोंवतीं निर्माण केल्यासारखं दिसत होतं. शरिराच्या साऱ्याच कांतिमान्–मंजुमोहक रेषा प्रगल्भतेचा मोठा नितांत रम्य भाव दर्शवीत होत्या. दुग्धभारानंच कीं काय काचित् झपावल्या सारख्या दिसणाऱ्या स्तनमंडलाच्या वस्त्रावरील लकेरी म्हणजे तिच्या मृदु आणि सत्वशील अंतःशक्तींचा मनोज्ञ विकासच नव्हे तर काय! तो साराच डौल अति आल्हादकारी होता.

बाबूचं मन क्षणभर भाव सकुल झालं अन् त्या भरांत त्यानं विचारलं,

"डोकं ठेऊं मी तुमच्या मांडीवर"!

तिनं परवानगी दिल्यावर कमालीच्या हलुवारपणानं आपलं विविध विचारांच्या कल्लोळांनीं शिणलेलं माथं त्यानं तिच्या मांडीवर ठेवलं. दैवी चमत्कार माणूस ज्या कुतूहलानं अन् कौतुकानं पहातो अथवा ऐकतो तशी त्याची क्षणभर अवस्था होती. हळूंहळूं त्यानं आपलं तोंड तिच्या मांडीत रुतवलं, अन् मनाच्या मनालाच ऐकूं येईल अशा आवाजांत हांक मारली,

" आई ! "

ती हांक अशी होती कीं, कित्येक यशोदांच्या निर्भर उरांतून तत्काळ दुधांच्या नुसत्या धारा गळूं लागत होत्या.

नर्सला ती हांक ऐकूं गेली असावी. एक कढत अश्रू गालावर पडला तेव्हां बाबूनं चमकून वर पाहिलं. केवढा चमत्कार ! कृत्रिम सहानुभावांचीं विश्वं निर्माण करणाऱ्या त्या पगारी परिचारिकेचे नेत्र आसावले होते ! कित्येक दिवसानंतर, साचत आलेला मातृभाव अशा-रीतीनं प्रगट करण्याची तिला संधी मिळली होती.

" नर्स ! हें काय ? "

" कांहीं नाहीं ! तुला तुझ्या आईनं टाकलं तसा मला माझाहि मुलगा जवळ करतां आला नाहीं. त्या तापदायक आठवणी खळ-खळल्या एवढंच ! "

कांहीका असेना, आईच्या साऱ्या दयाशीलतेचा अन् प्रगाढ प्रेमाचा अतिशय जवळून प्रत्यय आल्यामुळं बाबूला कमालीचं हलकं हलकं वाटत गेलं अन् मनांत चैतन्याचा थोडा भाव प्रगट होऊं लागला.

खोलीच्या मागच्या खिडकीतून पाहिलं की, जवळच्या फेन्सींग पलीकडून रस्ता वाहतांना दिसत होता. तिथून स्मशानाकडं प्रेतं जात होतीं. नवे झालेले कैदी ठाण्यावरून जेलकडं नेले जात होते ते ह्याच रस्त्यानं. बाहेरून भरून आलेल्या लॉऱ्या धाडधाड आवाज करीत गांवांत जात होत्या. शेतांत राबणारीं माणसं येत जात होतीं. डाव्या हातला देवळाचा थोडासा भाग दूरवर दिसत होता. शुक्रवारीं थोडीशी रहदारी वाढली कीं ती दर्ग्याकडं निघाली आहे अशी कल्पना करतां येत होती. अन् संध्याकाळीं हवा खायला निघणारी

खडाळ्यातली पांढरपेशी हौस ह्याच रस्त्यानं रखडत बाहेर पडत होती. एकादं वर्तमानपत्र अथवा एकादा भावचित्रांचा संग्रह पुरवणार नाहीं एवढ्या बातम्या अन् रम्य दृष्यें हा रस्ता बाबूला पुरवीत होता. बातम्यांचे अन् दृश्याचे आले तसे न् दिसले तसे लहान लहान तुकडे जुळवून आतां वेगवेगळ्या कथा तयार होत होत्या. चौधरी वकील गतप्राण झाले होते. त्यांचा 'तो दिवस' उगवला नव्हता अखेर. तें सारासार विचार शक्तींना चालना देणारं कोडं त्यांना पावलं नव्हतं म्हणायचं. त्यांचा काळ झाला तेव्हां उधारीवाल्यांनीं त्यांचं सामान हरास केलं होतं. अन् इतर सामानापेक्षां ते 'वीकली' चे अंक, कोड्यांचीं टिपणं अन् वापरून उधडलेले शब्दकोश बाजारांत अधीक वजनदार आणि किंमती ठरले होते. त्यांचं तें औदार्य आणि 'वार सोडूं नकोस' असं सांगणारी ती विलक्षण सकरुण दृष्टी कुठंतरी अधांत्री अजून दिसत होती ! ........

अन् सोनफुल्यांनीं आपलं चरित्र असं संपविलं होतं तर ! बाप आणि बायको खलास झाल्यावर त्यांनीं आत्महत्या केली होती. तिखट आणि कडवट विचार फाडफाड बोलून दाखविणारा माणूस चाळीस रुपड्यांवर कुठं रखडत पडला होता ? माणसाची गुणवत्ता त्याच्या पोशाखावरून, त्याच्या पगारावरून, त्याच्या आसपासच्या वातावरणावरून कीं त्याच्या विचारावरून ठरवायची असते ? त्यांच्या प्रेतयात्रेला वेळेवर धड चार माणसं देखील मिळालीं नव्हतीं.

रस्त्यावर शृंखलांचा खळखळाट झाला होता. श्यामची मूर्ती सालंकृत होत्साती जेलकडं गमन करीत होती. अरेरे, बंगल्यांत सिगारेट ओढीत बसायची त्याचीं स्वप्नं आतां जेलखान्यांत खडी फोडतांना सफल होणार होतीं कीं काय ?

पण ह्या जुन्या ऋणानुबंधांच्या उत्कर्ष अथवा विलयाशीं आतां त्याला काय करायचं होतं !

गजाळीच्या खिडकीतून आकाशाचा तुकडा दिसत होता अन् तो दिसेल तेवढा बाबू आपल्या डोळ्यांनीं टिपून घेत होता. समोर स्पष्टास्पष्ट हिरवीं झाडं अन् हिरवी शेतं दिसत होतीं. त्या साऱ्यावर शरदाची बहार लवथवत होती. थोडंसं गार वारं हळुवार वहात होतं. अन् झाडांचीं पानं केवळ्या मंद मधुरगतीनं त्यांत हलत डुलत होतीं. जणूं आपल्या शिरावर असलेला, जीवन द्रव्यांनीं कांठोकांठ भरलेला हिरवा मधुकुंभ जरा कुठे गती चुकली तर हिसळून जाईल याची त्यांना भीती वाटत होती !

ढगांच्या निरनिराळ्या आकृति अन् त्यांच्या उलट सुलट हाल-चाली पाहण्याचा तर त्याच्या मनाला छंद लागला होता. त्यानं नागनाथांचा रथ एका अत्यंत रम्य मंदिराच्या विशाल प्रकारांत फिरतांना पाहिला होता. आकाशांतील कांहीं विशिष्ट प्रकारच्या ढगाकडं पाहून त्याला नागनाथाच्या रथाच्या शिखराची किंवा त्याच्या मंदिराच्या कळसाची आठवण येत होती. ते ढग ह्या हवामानांत कुठं आढळत नव्हते. ते केव्हां येतील याची त्याला उत्कंठा लागत होती.

अगदी जवळ अन् समोरच्या झाडाखालीं एकदा एका मऱ्हाठीण बसलेली त्याला दिसली. कडेवरल्या मुलाच्या स्तन्यासाठींच ती थांबली असावी. आरोग्य तिच्या शरिरांत थयथयत होतं. अन् तिचं मूल तर तिचीच प्रतिमा होती. रस्ता वहात होता. पण लज्जेचे सारे क्षुद्र संकेत सोडून खुशाल पदर तिनं वर केला होता अन् आपल्या

मुलाला उराशी घेतलं होतं. तें मूल तिचंच म्हणजे लग्नाच्या नवऱ्यापासून नाहीतर एकाद्या बाह्यसंबंधापासून झालेलं असेल, पण आतांची ही जीवनप्रेरणा आणि जीवनानुभूति ह्यांत अनैतिक कोणता भाग होता ?........

बाबूला जगावसं कडकडून वाटूं लागलं होतं. खेळकरी मुलांच्या आरोळ्या ऐकल्या कीं एकदम पळत जाऊन त्यांत मिसळावं म्हणून तो हालचाल करीत होता. एकसारखं एका ठिकाणीं पडून राहिल्यामुळं वृत्ती आंबून चालल्या होत्या. मोकळेपणासाठीं अन् मोकळ्या हवेसाठीं तो धडपडूं लागला होता. देवळांत घंटानाद ऐकला कीं, त्या प्राकारांत जाऊन एकादा रथ मिरवावा, नाहीतर एकटं एकीकडं बसून भक्त्युद्गद अन्तकरणानं ध्यानस्त होऊन बसावं अशीही इच्छा उद्भवली होती.

नर्सचं घर पाहण्याची त्याला इच्छा झाली होती.

नर्सनं विचारलं,

" तुला आवडेल तें ? "....

"कां नाहीं, तुमच्याकडे पाहिलं कीं तें मोठं चांगलं असावं अशी कल्पना येते ! "

" आतां येतोस ? "

" अशा दैन्यावस्थेंत नाहीं ! बरा झालों कीं, पहिल्यांदा तुमचं घर पाहणार मी ! "

ज्या घरांत कायमचं राहण्यासाठीं नर्सनं त्याच्याकडून कबूली घेतली होती त्या घराचं तिनं वर्णन केलं होतं,

" सरकारी क्वार्टर्स आहेत ते. पण छोटसं अन् टुमदार. तूं बरा हो लवकर. तुला खात्रीनं तिथं यावसं वाटेल. उत्तरेकडं तोंड करून उभं आहे तें. समोर दूरवर बघितलं कीं, डोंगरांची एक निळसर रांग दिसते. अन् क्षितीजाला टेकलेला तो अस्पष्ट निळा गूढ आशय संध्याकाळीं तर घटकानघटका पहात बसावासा वाटतो. पुढं लहानसं आंगण राखणाऱ्या तिन्ही बाजूंनीं भिंती आहेत. अंगणांत फारशी फुलझाडं नाहींत ! व्हरांड्याच्या लाकडी जाळीवर चढलेल्या वेलीवर गंधहीन फिकट जांभळ्या रंगाचीं फुलं पाहून तुला फार बरं वाटेल. मधला लहानसा दिवाणखाना. दोन्ही बाजूंनी दोन खोल्या. पलीकडं स्वयंपाकघर ! खलास ! "

खरंच, त्याच्या तीन खणी खोलीपेक्षां हें घर कित्येक पटीनं चांगलं नव्हतं ? घरांत नर्सचा एक लहानसा पुस्तक संग्रह होता. रामायण, महाभारत, तुकारामाचा गाथा पुनः पुन्हां ती वाचत होती. दुःख दग्ध मनाला शांती द्यायचं सामर्थ्य त्यांत आहे असं तिनं सांगितलं होतं. याखेरीज घरांत विशेष शोभेच्या वस्तू नव्हत्या. फोटो तर मुळीच नव्हते. फोटोसंबंधीं बोलतांना नर्सनं म्हटलं होतं,

" भिंताडं उकरायचा हा फोटोंचा मोठा वेडसर नाद आहे बाबू ! मी जन्मांत कधी माझं छायाचित्र काढून घेतलं नाही. काळावर छाप पाडण्यासारखं कांहीं घडलं तरच त्या छाया चित्राला कांहीं महत्त्व ! नाही तर एकाद्याला घरांत सत्कार करण्यासाठी आणायचं अन् आपल्या अहंभावाच्या निरनिराळ्या निर्जीव छाया पहाणाऱ्याच्याच नजरेत भरतील अशा टांगून ठेवायच्या म्हणजे काय ! "........

"काळावर छाप पाडण्यासारखं आपल्या हातून कांही घडलं तरच त्या छाया चित्राला कांहीं महत्व!"

नर्सच्या घरांत हें जिवंत चित्र काय शोभून दिसणारं नव्हतं?

गांवांत दुपारी कसलासा प्रचंड जयजयकार ऐकूं आला!

आपल्या कानाची सारी शक्ति एकवटून बाबूनें तो ऐकला. काय होतं कुणाला माहित? पण त्याला फार वेळ थांबावं लागलं नाहीं. संध्याकाळीं फिरायला निघालेल्यांच्या संभाषणांतून स्वामीजी आल्याची वार्ता त्याच्या कानावर आली. स्वामीजी—! प्रकाशाचा फार मोठा झोत एकदम पुढं आल्यावर व्हावी तशी त्याची अवस्था झाली. हाताचे तळवे त्याने आपल्या डोळ्यावर झाकले अन् नंतर त्याच्या साऱ्या स्मृति खाडकन् जाग्या झाल्या.

मागावून येणारा आणखी कोणीएक स्वामीजींच्या व्याख्यानांतील वाक्यं उच्चारीत होता,

"उगीच नाहीं स्वामीजी म्हणत, माणूस इतरांवर आघात करतो त्यावेळीं तो आपली दुर्बलता व्यक्त करीत असतो. इतरांनीं केलेले आघात झेलतांना न् सहन करतांना माणसाची आत्मिक शक्ति क्षणाक्षणाला वाढत जाते."

कांहीं अपूर्व जादू व्हावी त्याप्रमाणं आतांपर्यंतच्या आयुष्यांतला नको असलेला कुजट भाग आपोआप गळून पडून धारणेस योग्य तेवढाच भाग त्याला आठवूं लागला.

स्टेशनवर खूप गर्दी झाली होती. स्वामीजींच्या जयघोषानं अंतराळ थरारलं होतं. एखाद्या ईश्वरी शक्तीचाच कीं काय आवेश आणि आदेश घेऊन स्वामीजी प्रगट झाले होते. अन् बाबूला

म्हणाले होते, " बाबु दडके, प्रयोगावस्थेतलं हें कृपाण पेलण्या-साठीं तूं आपलं मानसिक सामर्थ्य वाढविलं पाहिजेस.

तें एक लोकोत्तर व्यक्तित्व होतं. बाबूनं जन्मात तें पहिल्यां-दाच अतिशय जवळून पाहिलं होतं अन् आदर्शासाठींच त्याची निवड केली होती.

' झडप ' असा एक प्रहार झाला होता. अन् शाळेवर बहिष्कार पुकारणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुढारी कोण? असं सीताराम गर्जून विचारीत होते.

बाबू दडक्याचं खणकेबाज आवाजांत उत्तर आलं होतं,

" मला माहित नाहीं ! "

' इदाऱ्यांत ' हिंदुमुस्लिम ऐक्यावर मोठ्या जोसांत बोललेला अजीजुद्दीन ' रफीक ' निरपराधी हिंदूवर प्रहार करीत होता. बाबू दडक्यानं तें पाहिलं होतं; पोलीस आले होते. अन् त्यानं सांगितलं होतं,

" अजीज दंग्यांत नव्हता, " कंदिलाचे तापलेले कांच हातात धरून ठेवतां येतात कां, हें तो पहात होता. आकाशी विचारीत होती,

" बाबू हें एवढं दिव्य कशासाठीं ! " बाबू दडक्यानं उत्तर केलं होतं,

" आकाशी ! उद्या आपल्या अन् राष्ट्राच्या जीवनांत कस-कसले प्रसंग येतील हें कुणी सांगावं ? आपण आपल्या तयारीनं असलेलं बरं नाहीं कां ?

" प्रहाराच्या वेदना मनाला जाणवल्या कीं दुर्बलता आपला प्रभाव गाजवूं लागते. हातावर कुणी जळजळीत निखारे ठेवले तर तर असं वाटलं पाहिजे कीं तीं मोगरीचीं फुलं आहेत ! .... "

सत्याग्रह सुरू झाला होता. बाबू दहक्याचा दिवस तर अगदी जवळ आला होता. परीक्षाहि तशीच जवळ— आली होती. पण शाळेची अगर परीक्षेची फिकीर करीत बसण्याचा तो काळ नव्हता. जुन्याला कंटाळून प्रतिकाराची उठावणी झाली होती. लक्षावधी लोकांचे जिथे जीव गुंतले होते, तिथं एकट्याचं अन् एकट्यापुरतं पाहण्यासारखं दुसरं दुष्कृत्य नव्हतं. दुसरा राष्ट्रघात नव्हता !................

या जविनांत केवढी तेजस्विता होती, जिवंतपणाची किती खोल प्रतीति होती. त्यागाचं अन् आत्मयज्ञाचं केवढं ऐश्वर्य होतं ! लैकिक भ्रमाचीं अन् त्यांतून निर्माण झालेल्या दुःखाचीं जळमटं एकदम झडून जिवंतपणाचा असा कांहीं मुद्दाम आवेश त्याच्या सबंध शरिरांत संचरून आला कीं त्या रोगट खोलीचीं भिंताडं न् छत भेदून अंतराळांत नुसत्या भराऱ्या माराव्या असं त्याला वाटलं. पण या मनोविकसनावर जडता आपला हात ठेऊं पहात होती. मग जें दिसत होतं अन् जाणवत होतं तें अंधुक आणि अनाकळ होत चाललं होतं. शेजारच्या खोलींत एक तरुण मुलगी आपल्या आजारी आईस घेऊन आली होती. दुपारीं क्षीण होत चाललेल्या त्याच्या जाणिवेवर एका त्रुटित संवादाचे आघात झाले होते.

"बाबूला तूं नीट ओळखलं नाहीस, बेहेन !" उत्तरादाखल एक हुंदका आला होता. आकाश पृथ्वी क्षणभर थरारून जातील एवढा त्या हुंदक्यांत पश्चात्ताप अन् अनुताप होता.

त्या हुंदक्यातून जरा वेळानं वाचा फुटली होती,

" कुठं असेल तो आता ! "

" कित्येक दिवसापासून मी शोधतो आहे त्याला. माझ्या बद्दल त्याच्या मनांत कसला विकल्प आला होता कोण जाणे; तुरुंगांत असतांना त्यानं माझी भेट टाळली. अन् पुढं तर तो मला कुठंच दिसला नाहीं. आज तो या खडाळ्यांत असायला हवा होता. सरकारनं देऊं केलेल्या सुधारणाचं लेणं बाहेर पडलं आहे. तें इतकं तकलुबी आहे कीं जनता त्याला राबवायला मुळींच तयार नाहीं. आज या सुधारणांच्या सार्वत्रिक निषेधाचा दिवस. काळीं निशाणं घेऊन आम्ही मिरवणुकी काढणार. गोळीबारानं या मिरवणुकीचं स्वागत होईल. पण त्याचं काय ? स्वामीजी म्हणतात, प्रहार करणारी वृत्ती अर्थात् क्रूर आणि पाशवी ! लौकिकदृष्ट्या ती कितीही शस्त्रास्त्र सुसज्जित असली तरी एकाद्या कमालीच्या दुबळ्या माणसालाहि वाटणार नाहीं इतकं आत्मसंरक्षणाचं तिला भय असत ! बाबू असता तर त्यानं या मिरवणुकींत भाग घेतला असता, ह्याला कांहीं महत्व नाहीं. पण एकाकाळीं जातीय भावनेच्या आहारीं जाऊन स्थानिक दंग्यांत ज्यानं भाग घेतला होता, तोच त्याचा एक मित्र आज जुलमी सत्ते विरुद्ध झगडायला उभा आहे आहे हें त्याला पहायला मिळालं असतं....! "

मग काय विचारतां !

मिरवणूक निघाली होती. बाबू दडके आपली तुटकी चप्पल फरकीत सर्वांच्या पुढं चालला होता. अनीजच्या 'मा' नं विणलेल्या कापडाच्या कोटाचा एक खिसा उधडून बाहेर आला होता. अन् तो लोंबत सुटला होता. शर्टला बटणं नव्हतीं. अन् त्याचं छाताड पूर्ण उघडं दिसत होतं. पण ह्या गबाळ्या पोशाखाची

त्याला जाणीव नव्हती. त्याच्या चेहऱ्यावर, गतीतून आणि गतीच्या झोकांतून असा कांहीं खणखणीत प्रत्ययाला येत होता कीं त्या गबाळ्या पोशाखाचाच फार सत्कार होता ! शेजारी अजीज ! त्या दोन आघाडीवरल्या सैनिकांकडे पाहून रामकृष्णांचं कांहीं अवतार कार्य अपुरं राहिलं आहे, असं वाटत होतं. खवळलेल्या जनतासागराचा अनावर हेलाव त्यांच्या मागून येत होता. सुधारणांच्या निषेधाच्या शब्दांनीं आकाशाचा भेद होत होता. हा असीम उत्साह केवढे उत्पाद घडवून आणील म्हणून सत्ताधारी आणि सत्तावाहक घाबरले होते.

त्यांनीं आपलं शस्त्रास्त्राचं भांडार रिकामं केलं. लाठ्या सुरू झाल्या. गोळीबार होऊं लागला. बाबू दडक्यावर कैक लाठ्या पडल्या अन् त्याच्या उघड्या छाताडावर कैक मस्कटं रिकामीं झालीं. पण पाऊल चळलं नव्हतं. धीर ढळला नव्हता. ती अनुभूतीच अशी होती कीं, तिच्या वर्णनासाठीं विशालतेचे अन् सखोलतेचे सारे शाब्दिक संकेत फिके पडले होते ! ....

मग त्याची झुकूं लागलेली मान कुणीतरी सावरीत होतं.

कोण असावं तें ?

अजीज ?

आकाशी ?

छे !

नर्स होती ती !

" मी तुझी आई. जरा डोळे उघडून बघ बाबू ! "

असं कांहींसं ती सद्गद आवाजांत म्हणत होती. बाबू दट-क्याला ते ऐकूं गेलं होतं किंवा नाहीं कुणाला माहित.

आपल्या उघड्या छाताडावर प्रहार झेलीत तो पुढं पुढं चालला होता ............